# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २२६) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.०८ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## ...तर एक क्षणही पदावर राहणार नाही- एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – नीट परीक्षेचा पेपरफुटी प्रकरण ताजे असतानाच एमपीएससीच्या पेपरफुटीचे प्रकरण समोर आले. त्यानंतर राज्यात विद्यार्थ्यांनी निदर्शने करण्यास सुरुवात केली. आज पुण्यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच विरोधी पक्षातील नेत्यांनी मोर्चा काढला. सरकारसह महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्यावर देखील आरोप करण्यात आले. त्यावर आता भीमनवार यांनी निवेदन देत त्यांच्यावर होत असलेले आरोप फेटाळून लावले आहेत. विवेक भीमनवार म्हणाले, एमपीएससी पेपरफुटीच्या प्रकरणात सातत्याने अनुचित आरोप माझ्याविरोधात केले जात आहेत. यासंदर्भात दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी स्वयंस्पष्ट निवेदन जारी करण्यात आले होते. औषध निरीक्षक परीक्षेशी संबंधित प्रश्नपत्रिका फुटीचा घटनाक्रम हा मी रुजू होण्यापूर्वीचा आहे, हे मी आधीच त्यात स्पष्ट केले आहे. याबाबत आयोगाने तक्रार प्राप्त होताच पोलिसांत तक्रार केली आणि त्याचा तपास सुरु आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती न होण्यासाठी एक उच्चस्तरिय समिती एमपीएससीने गठीत केली आहे आणि राज्य सरकारनेही एक उच्चाधिकार समिती गठीत करुन विभागीय स्तरावर जाऊन विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्याशी सल्लामसलतीची प्रक्रिया आरंभ केली आहे, असे ते म्हणाले.


# मराठा आरक्षणासाठी सरकारकडून जाणूनबुजून हलगर्जीपणा -मनोज जरांगे

### आंदोलकांवर हल्ल्याचा कट; फडणवीसांना बदनाम करण्याचे षड्यंत्र सुरू असल्याचा आरोप

जालना, दि. ७ (प्रतिनिधी) – मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले आहेत. आज त्यांच्या आंदोलनाचा १० वा दिवस आहे. गेली २ दिवस त्यांनी उपचार आणि पाणी न घेण्याचा निर्णय घेतल्याने त्यांची प्रकृती खराब झाली आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणाबद्दल सरकारकडून मुद्दाम हलगर्जीपणा सुरू करण्यात आला आहे. मराठा समाज संपला पाहिजे म्हणून हे सर्व सुरू आहे. यामुळेच मराठा समाज संतापला आहे. सरकार १५ दिवसांमध्ये काहीच करू शकले नाही. २९ जूनला सांगितले होते की उपोषणाला बसण्याची वेळ येऊ देऊ नका. पण सरकारकडून ३ महिन्यात काहीही केले नाही.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, हे आंदोलन दाबण्यासाठी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांची मिलीभगत आहे. छत्रपती संभाजीनगरात सत्ताधारी मंत्र्यांची बैठक होऊन हे आंदोलन मोडीत काढण्याचा कट रचला गेला



आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये शिंदेंच्या मंत्र्यांची एक बैठक पार पडली, ज्यामध्ये हे आंदोलन कसे मोडीत काढता येईल यावर सविस्तर चर्चा झाली. या कटाचाच एक भाग म्हणून मराठा समाज जेव्हा मुंबईकडे कूच करेल, तेव्हा पोलिसांकडून आंदोलकांवर अचानक हल्ला करवायचा, जेणेकरून गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस थेट बदनाम होतील. या संपूर्ण कटात भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे यांचीही दोन माणसे सहभागी आहेत, असा आरोप जरांगे पाटील यांनी केला आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, केवळ शिंदेंचे मंत्रीच नाही, तर फडणवीस यांच्याही डोक्यात हाच विचार सुरू आहे. मराठा आंदोलनाला हिंसक वळण देऊन आंदोलन बदनाम करणे आणि मराठा समाजाचा आवाज कायमचा दाबणे हाच या सत्ताधाऱ्यांचा छुपा अजेंडा आहे. जर मुंबईला जाताना आपल्या बांधवांना आडवा-आडवी झाली किंवा त्यांचे रक्त निघाले तर १० मिनिटात महाराष्ट्र बंद पाडा. कारण ही सर्व मुलं आपल्यासाठी मुंबईत जात आहे. पोलिसांनी कितीही त्रास दिला तर त्यांना मराठा बांधवांनी त्यांना त्रास द्यायचा नाही. बॅरिकेट लावले तर बाजूला सरकत पुढे जायचे. शांततेत मुंबईकडे जायचे, कोणालाही मोजायचे नाही. पोलिसांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केलाच तर पळू नका, त्यांना सांगा आम्ही वर्दीचा आदर करतो म्हणून शांत आहोत. परिस्थिती नुसार पळ काढा पण दबा धरा. स्वरक्षण सुद्धा तितकेच गरजेचे आहे. गेम तर बसला पाहिजे पण दिसू पण नाही, असे ते म्हणाले.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात केस होत नव्हती. थेट जीव जात होता पण मा जिजाऊंनी कधीच मागे पाऊल टाकले नाही. त्यांनी थेट लढायचे ठरवले हा आपला इतिहास आहे. ज्यांना काही केस पडण्याची भीती असेल त्यांनी माझ्यासोबत मुंबईत येऊच नये. महाराष्ट्रात जर कोणीच चांगले जगू शकत नाही, मग सरकाराचा माज उतरवण्याचे काम केले पाहिजे. देवेंद्र फडणवीस मुघलांपेक्षा जास्त वाईट परिस्थिती आणतो, तो लोकांना उद्धवस्त करत आहे. जो विरोधात बोलतो त्यांच्यामागे ईडी लावतात. इतकी हिटलरशाही तुम्ही कसे सहन करतात. शिंदेंचे आणि त्यांच्या मंत्र्यांचे हाल सुरू आहेत. अजित पवारांचे काय झाले काही माहिती नाही. सोन्यासारखा माणूस गेला पण त्याबद्दलची काही माहिती समोर आलीच नाही. मराठा आरक्षणासाठी काहीच करायचे नाही, केवळ इतरांवर टीका करतात. मविआने आपल्याला काहीच दिले नाही, शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेसने काहीच दिले नाही. पण तुम्ही देऊन काढून घेतले, असा घणाघातही जरांगे यांनी केला.

# अल् निनोचा प्रभाव; दुष्काळाचे संकट गडद

### मराठवाड्यातील सर्व धरणातले पाणी पिण्यासाठी राखीव

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – अल् निनोच्या वाढत्या प्रभावामुळे मराठवाड्यावर भीषण दुष्काळाचे संकट घोंघावते आहे. हे पाहून सर्व धरणातले पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे आदेश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिलेत. परिस्थितीचे गांभीर्य पाहता रब्बी पिकांसाठीही या धरणातील पाण्याचे नियोजन करण्यात येणार नाही.

मराठवाड्यात यंदा पावसाने दांडी मारल्यामुळे भीषण पाणीटंचाईचे सावट पसरले आहे. जून ते ऑगस्ट या मुख्य मान्सूनच्या काळात सरासरीच्या तुलनेत अतिशय अल्प पाऊस झाल्याने शेतातील पिके तर करपलीच आहेत, पण त्याचसोबत भागातील प्रमुख जलाशये देखील कोरडीठाक राहण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने अत्यंत कठोर पाऊल उचलत विभागातील पाण्याचे नियोजन पूर्णपणे बदलले आहे.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिलेल्या माहितीनुसार, जायकवाडी धरण वगळता मराठवाड्यातील इतर सर्व लहान-मोठ्या धरणांमधील उपलब्ध जलसाठा १००% फक्त आणि फक्त पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्यात आला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता यंदा रब्बी हंगामासाठी धरणांतून पाण्याचे कोणतेही नियोजन केले जाणार नाही.

यंदाच्या पावसाळ्यात जून आणि जुलै महिन्यात राज्यातील अनेक भागांत चांगला पाऊस झाला होता. त्यामुळे खरीप हंगामाला सुरुवातीला काहीसा आधार मिळाला. मात्र, ऑगस्टमध्ये पावसाचा वेग मोठ्या प्रमाणात मंदावल्याने पावसाची तूट निर्माण झाली. कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांच्या कालावधीत राज्यात सरासरीच्या ८६.२ टक्के पाऊस झाला. या कालावधीत सामान्य पावसाचे प्रमाण ८१५.३ मिमी असताना प्रत्यक्षात ७०२.६ मिमी पाऊस नोंदवण्यात आला. विशेष म्हणजे, ऑगस्ट महिन्यात राज्यात सरासरीच्या केवळ ५०.९ टक्के पाऊस झाला. यामुळे ऑगस्टच्या अखेरीस आणि सप्टेंबरच्या सुरुवातीला खरीप पिकांसाठी पावसाची गरज अधिक वाढली आहे.

भारतीय हवामान विभागाच्या १ जून ते ६ सप्टेंबर या कालावधीतील अहवालानुसार, संपूर्ण महाराष्ट्रात सर्वात वाईट परिस्थिती मराठवाड्याची आहे. या भागात तब्बल ३४% पावसाची तूट नोंदवली गेली आहे. ऐन पिकांच्या वाढीच्या काळात पावसाने तोंड फिरवल्यामुळे आगामी काळात नागरिकांना आणि प्रशासनाला पाणीटंचाईचा मोठा सामना करावा लागण्याची चिन्हे आहेत.

# एमपीएससी पेपरफुटी, निकालातील गोंधळाविरोधात विद्यार्थ्यांचा आक्रोश मोर्चा

### खा. सुप्रिया सुळे आणि रोहित पवार सहभागी

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभारातील कथित ढिसाळपणा, पेपरफुटी आणि निकालातील गोंधळाविरोधात आज पुण्यात एमपीएससीच्या हजारो विद्यार्थ्यांनी भव्य 'आक्रोश मोर्चा' काढला. ओंकारेश्वर मंदिर ते पुणे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांसारख्या प्रमुख राजकीय पक्षांनी या आंदोलनाला आपला जाहीर पाठिंबा दर्शवला. मोर्चामध्ये राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार आणि स्थानिक ठाकरे गटाचे शिवसेना नेते हे प्रामुख्याने सहभागी झाले.

मोर्चात सहभागी झाल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली. 'मुलं रस्त्यावर उतरलेली असताना सरकारने त्यांचे ऐकून तरी घ्यायला हवे, चर्चेला बसायला हवे. विद्यार्थ्यांचा अर्धा वेळ अभ्यासिकेऐवजी रस्त्यावर आंदोलने करण्यात जात आहे, हे सरकारचे मोठे अपयश आहे,' असा घणाघात सुळेंनी केला. पेपरफुटीबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, देशात 'टोफेल' आणि 'जीआरई' सारख्या परीक्षा होतात, तिथे पेपर फुटत नाहीत. एआय तंत्रज्ञान असतानाही पेपर फुटणे थांबत नाही, यावर माझा विश्वास नाही.' तसेच, देशात आणि राज्यात सुरू असलेल्या आर्थिक संकटावरून लक्ष विचलित करण्यासाठीच सरकार दोन धर्मांमध्ये भांडणे लावत असल्याचा आरोपही त्यांनी केला. सरकारने हट्टीपणा सोडून जबाबदार व्यक्तीला पाठवून विद्यार्थ्यांशी चर्चा करावी आणि जंतर-मंतर सारखा उद्रेक टाळावा, असे आवाहन त्यांनी केले.

# मराठा विद्यार्थ्यांना ओबीसीप्रमाणेच मिळणार शैक्षणिक सवलती

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – मराठा आरक्षणाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांचे आंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू असताना राज्य सरकारच्या पातळीवर महत्त्वाच्या हालचालींना वेग आला आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने मराठा, कुणबी आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास एसइबीसी प्रवर्गातील विद्यार्थी आणि तरुणांसाठी चार महत्त्वाचे शासकीय आदेश जारी केले आहेत. शिक्षणातील सवलतींपासून वसतिगृह निर्वाह भत्ता, परदेशी शिक्षणासाठीची शिष्यवृत्ती आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणापर्यंत या निर्णयांचा समावेश आहे. यामुळे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने काही मागण्यांच्या संदर्भात तातडीने प्रशासकीय पावले उचलल्याचे चित्र आहे. मात्र, मराठा आरक्षणाचा मूळ प्रश्न, कुणबी नोंदी आणि संबंधित मागण्यांवर अंतिम तोडगा निघालेला नसल्याने आंदोलनाच्या पुढील भूमिकेकडेही लक्ष लागले आहे.

सरकारच्या निर्णयांपैकी सर्वात महत्त्वाचा निर्णय तंत्रशिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांशी संबंधित आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाने राज्यातील सर्व विभागीय कार्यालये आणि विद्यापीठांना याबाबत निर्देश दिले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे उपलब्ध असलेल्या (पान ४ वर)

# धनगर समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण द्या

### मुंबईत आक्रोश मोर्चा, गोपीचंद पडळकरांची सरकारला स्पष्ट मागणी

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनाची धग आता मुंबईतही पाहायला मिळाली. आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली धनगर समाजाच्या वतीने मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयावर 'आक्रोश मोर्चा' काढण्यात आला. मोठ्या संख्येने समाजबांधव या मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने ठोस निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

धनगर समाजाला आरक्षण देण्याचा प्रश्न केवळ न्यायालयीन प्रक्रियेपुरता मर्यादित न ठेवता सरकारने आपल्या घटनात्मक अधिकारांचा वापर करून त्यावर मार्ग काढावा. सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून मार्ग निघत असेल तर तो मार्ग स्वीकारावा; अन्यथा सरकारच्या अधिकारात जे काही शक्य आहे, त्या मार्गाने धनगर समाजाला आरक्षण द्यावे. मात्र आरक्षणाची अंमलबजावणी झालीच पाहिजे, अशी भूमिका गोपीचंद पडळकर यांनी मांडली. मुंबईतील आंदोलनादरम्यान पडळकर यांनी धनगर आरक्षणाच्या मागणीसोबत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि वीर शिंग्रोबा धनगर यांच्या स्मृतीशी संबंधित मागण्याही सरकारसमोर मांडल्या.

धनगर समाजाच्या आरक्षणासाठी गेल्या अनेक वर्षांपासून विविध पातळ्यांवर संघर्ष सुरू आहे. या संघर्षाचे स्वरूप रस्त्यावरील आंदोलन, विधिमंडळातील पाठपुरावा आणि न्यायालयीन लढाई अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर असल्याचे पडळकर यांनी सांगितले. ङ्गआम्ही दोन टप्प्यांत लढत आहोत. एक लढा रस्त्यावर आणि विधानसभेत सुरू आहे, तर दुसरी न्यायालयीन लढाई आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली. धनगर आरक्षणाच्या मागणीसंदर्भात न्यायालयीन प्रक्रियेचाही पडळकर यांनी उल्लेख केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, उच्च न्यायालयात धनगर समाजाच्या बाजूने निर्णय झाला नाही. या प्रकरणात राज्य सरकारने समाजाची बाजू मांडण्यासाठी मदत केली होती, मात्र त्यानंतरही निकाल अपेक्षेप्रमाणे लागला नाही. त्यानंतर समाजातील काही लोकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. तेथेही आरक्षणाची मागणी मान्य झाली नाही. या पार्श्वभूमीवर आता धनगर समाजाने नव्याने मागणी मांडली असून, त्यावर सरकारने आपली भूमिका स्पष्ट करणे अपेक्षित असल्याचे पडळकर म्हणाले.

# दिल्लीत ५ मजली इमारत कोसळून ७ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली, दि. ७ (वृत्तसंस्था) – दिल्लीतील सत्य निकेतन भागात ५ मजली इमारत कोसळून घडलेल्या भीषण दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला असून ढिगाऱ्याखालून १२ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आहे. या दुर्घटनेप्रकरणी दिल्ली सरकारने अत्यंत कडक पाऊल उचलले आहे. प्रशासकीय निष्काळजीपणाचा ठपका ठेवत दिल्ली महानगरपालिकेच्या ५ वरिष्ठ अधिकाऱ्यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे.

निलंबित करण्यात आलेल्यांमध्ये दक्षिण क्षेत्राचे उपआयुक्त, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, सहाय्यक अभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांचा समावेश आहे. दुर्घटनेची जबाबदारी निश्चित करत सरकारने निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर ही कठोर कारवाई केली आहे.एमसीडी आयुक्त संजीव खिरवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दुर्दैवी घटनेत ७ जणांनी आपला जीव गमावला आहे. कोसळलेल्या इमारतीच्या शेजारी असलेली दुसरी इमारत अत्यंत कमकुवत झाली असून रात्रभर तिला आधार देऊन मजबूत करण्यात आले आहे. येत्या १-२ दिवसांत ही इमारत सुरक्षितपणे पाडली जाईल. महापालिकेने गेल्या तीन महिन्यांत बेकायदेशीर बांधकामांवर ९६० कारवाया केल्या, ४०७ इमारती सील केल्या आणि १५०० हून अधिक इमारतींना नोटीस बजावली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुर्घटना घडल्यापासून इमारतीचा मालक हरिराम बन्सल फरार झाला असून दिल्ली पोलीस त्याचा तीव्रतेने शोध घेत आहेत. त्याला पकडण्यासाठी पोलिसांची अनेक पथके तैनात करण्यात आली असून तो देशाबाहेर पळून जाऊ नये म्हणून त्याच्याविरोधात लूकआऊट सर्कुलर जारी करण्यात आले आहे. स्थानिक रहिवाशांच्या मते, बन्सल हा हार्डवेअर व्यावसायिक असून या परिसरात त्याची अनेक घरे आणि मालमत्ता आहेत. घटनेच्या दुसऱ्या दिवशीही एनडीआरएफ आणि स्थानिक प्रशासनाकडून बचावकार्य सुरूच आहे. एनडीआरएफचे महानिरीक्षक नरेंद्र सिंह बुंदेला यांनी सांगितले की, ढिगाऱ्याखाली तांत्रिक शोध घेण्याचे काम अविरत सुरू आहे. ढिगाऱ्याचे अनेक थर उपसणे आणि अडकलेल्यांचा शोध घेणे अत्यंत जिकिरीचे काम असल्याने हे रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण होण्यासाठी संपूर्ण दिवस लागण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे. या दुर्दैवी अपघातात 'आत्मा राम सनातन धर्म कॉलेज'च्या बी.कॉमच्या 'अर्पित' नावाच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची माहिती कॉलेजचे प्राचार्य प्रा. ज्ञानतोष कुमार झा यांनी दिली. तर इतर जखमी विद्यार्थ्यांवर अखखचड ट्रॉमा सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत. घटनेनंतर परिसरातील दुकाने बंद झाल्यामुळे कॉलेज प्रशासनाने विद्यार्थ्यांना अन्न, पाणी आणि सुरक्षित राहण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून मृतांच्या कुटुंबीयांप्रति संवेदना प्रकट केल्या आहेत. त्यांनी जखमींना लवकरात लवकर आराम मिळावा अशी प्रार्थना केली असून घटनास्थळी मदत आणि बचावकार्य वेगाने सुरू असल्याचे सांगितले आहे.

# दोन धर्मांत भांडणे लावण्यापलीकडे सरकारला काम नाही-वडेट्टीवार

### मराठवाडा- विदर्भातील दुष्काळावरून राज्य सरकारवर टीका

नागपूर, दि. ७ (प्रतिनिधी) – महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाने पाठ फिरवल्याने शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत असताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. सरकारचे लक्ष दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे नसून दोन धर्मांमध्ये भांडणे लावण्याकडे आहे, असा आरोप त्यांनी केला. दोन धर्मांत भांडणं निर्माण करण्याचं आणि देश लुटण्याचं एवढंच सरकारचं काम आहे. याच्या पलीकडे या सरकारला कुठलाही विषय नाही, अशी टीका वडेट्टीवार यांनी नागपुरात माध्यमांशी बोलताना केली.

विदर्भासह मराठवाडा आणि राज्यातील काही भागांमध्ये पावसाची तूट कायम आहे. खरीप पिकांच्या वाढीसाठी सप्टेंबरमधील पाऊस अत्यंत महत्त्वाचा मानला जात असताना पाऊस कमी झाल्यास शेतकऱ्यांसमोरील संकट आणखी गडद होण्याची शक्यता आहे. देशातही सप्टेंबरमधील पावसाची स्थिती चिंताजनक राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून सोयाबीन, कापूस, मका आणि कडधान्यांसारखी पिके सध्या महत्त्वाच्या वाढीच्या टप्प्यात आहेत.

वडेट्टीवार यांनी विदर्भातील परिस्थितीचा उल्लेख करताना कृत्रिम पाऊस पाडण्याची मागणी होत असल्याचे सांगितले. सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, पुढील काळात पाण्याअभावी आणखी नुकसान होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. दुष्काळाची गंभीर स्थिती आहे. कृत्रिम पाऊस पाडावा, अशी मागणी होते आहे. विदर्भात सोयाबीनचं जवळपास २०० कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. आता पुन्हा प्रचंड नुकसान होणार आहे, असा दावा वडेट्टीवार यांनी केला. मराठवाड्यातही पावसाची तूट भरून काढण्यासाठी कृत्रिम पावसाची मागणी अलीकडेच करण्यात आली आहे. खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस आणि इतर पिकांना पावसाअभावी फटका बसत असल्याचे सांगत मुख्यमंत्री कार्यालयाकडे कृत्रिम पावसासाठी मागणी करण्यात आली होती. दरम्यान, भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार सप्टेंबरच्या सुरुवातीला महाराष्ट्रात पावसाचे वितरण असमान राहण्याची शक्यता आहे. कोकण-गोव्यात तुलनेने अधिक पाऊस अपेक्षित असताना मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाच्या सरी विखुरलेल्या स्वरूपात राहण्याचा अंदाज आहे. विदर्भातही सुरुवातीला तुरळक ते विखुरलेल्या पावसाची शक्यता असून पुढील काळात पावसाची तीव्रता वाढू शकते.

# तुम्ही सत्तेत आहात, शेतकऱ्यांना मदत मिळवून द्या - अंबादास दानवे

धाराशीव, दि. ७ (प्रतिनिधी) – सत्तेत असून मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिता तुम्हाला लाजा वाटायला हव्यात, असं म्हणत दुष्काळ परिस्थितीवर मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणाऱ्या लोकप्रतिनिधींवर आमदार अंबादास दानवेंनी सडकून टीका केली.

सत्तेत असून मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिता तुम्हाला लाजा वाटायला हव्यात, असं म्हणत दुष्काळ परिस्थितीवर मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणाऱ्या लोकप्रतिनिधींवर शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवेंनी सडकून टीका केली. तुम्ही सत्तेत आहात मदत मिळवून द्या, नुसते पत्र लिहू नका असेही दानवे म्हणाले. ओमराजे निंबाळकर सत्तेत गेले आहेत. आता तुमचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आहेत ना आता मदत मिळवून द्या असेही दानवे म्हहणाले. कृत्रिम पावसाबाबतही अंबादास दानवे यांनी भूमिका मांडली. कृत्रिम पावसाबाबतही अंबादास दानवे यांनी भूमिका मांडली आहे. कृत्रिम पाऊस वगैरे या गोष्टी होणार नाहीत. कृत्रिम पाऊस झाला असता तर पाऊस पडून सरकार निवांत झोपलं असतं असेही दानवे म्हणाले. धाराशिव जिल्ह्यातल्या पीक परिस्थितीची दानवेंकडून पाहणी करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. धाराशिवसह मराठवाड्यात दुष्काळ जन्य परिस्थिती आहे, सत्ताधारी पक्षाच्या आमदार खासदार शेतीची पाहणी करत मुख्यमंत्र्यांना मदतीसाठी पत्र लिहितात. यावर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सडकुन टीका केली.

# ग्रामीण भागातील नागरिकांना २५ दिवसांनी सिलेंडर बुक करता येणार

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – जागतिक बाजारातील घडामोडी आणि पुरवठा साखळीतील बदलांचा परिणाम देशातील गॅस वितरण आणि दरांवर होत असतो. ग्राहकांच्या गरजा तसेच बाजारातील परिस्थितीचा विचार करत सरकारने याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

आता ग्रामीण भागातील ग्राहकांनाही अवघ्या २५ दिवसांच्या अंतराने घरगुती एलपीजी सिलेंडरचे रिफिल बुक करता येणार आहे. केंद्र सरकारने ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी लागू असलेली ४५ दिवसांची बुकिंगची अट हटवली आहे. त्यामुळे आता ग्रामीण आणि शहरी भागातील सिलेंडर बुकिंगसाठी २५ दिवसांचे अंतर समान राहणार आहे. केंद्रीय पेट्रोलियम राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी सोमवारी याबाबत माहिती देताना सांगितले की, हा बदल तातडीने लागू करण्याचे निर्देश देशातील सर्व ऑइल मार्केटिंग कंपन्यांना देण्यात आले आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धादरम्यान ङ्झत्रः पुरवठ्यावर दबाव निर्माण झाला होता. त्यामुळे ९ मार्च २०२६ रोजी शहरी भागात रिफिल बुकिंगमधील अंतर २५ दिवस, तर १२ मार्च रोजी ग्रामीण भागात हे अंतर ४५ दिवस करण्यात आले होते.

# ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करणार - विखे पाटील

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. त्यासाठी १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात शिबिरे आयोजित करावीत; तसेच सर्व जिल्ह्यांमधील अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय ठेवून आरक्षणातील प्रत्येक प्रश्नाबाबत गांभीर्याने कार्यवाही करावी, अशा सूचना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागीय आयुक्तांसह सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सोमवारी दिल्या.

मंत्री विखे पाटील यांनी मराठवाड्यातील धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, लातूर, जालना या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी यांच्याशी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेऊन झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. या बैठकीमध्ये मंत्री विखे पाटील यांनी जिल्हानिहाय देण्यात आलेली जात पडताळणी प्रमाणपत्रांची संख्या, कुणबी नोंदी तसेच प्राप्त झालेल्या अर्जांचा सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीची तसेच अंमलबजावणीची सविस्तर माहिती बैठकीमध्ये सादर केली. यामध्ये प्रामुख्याने परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाने सापडलेल्या नोंदी वेबसाईटच्या माध्यमातून जाहीर केल्या आहेत. त्याच पद्धतीने इतर जिल्ह्यांनीही अशाच प्रकारची कार्यवाही करावी आणि १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रमाणपत्रांच्या पूर्ततेसाठी शिबिरे आयोजित करून अधिक चांगल्या पद्धतीचे नियोजन करावे, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीमध्ये दिल्या. बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मंत्री विखे पाटील म्हणाले, कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. वंशावळ आणि कायदेशीर नियमांचे पालन करूनच प्रमाणपत्रे दिली जातील. मराठवाड्यात आतापर्यंत साडेतीन लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाली आहेत. पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे देताना नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल. मनोज जरांगे पाटील हे समाजासाठी आंदोलन करीत असून, त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत सरकार त्यांच्याशी चर्चा करणारच आहे. काही लोकांना त्या पायघड्या वाटत असतील, पण हे सर्व आरोप बिनबुडाचे आहेत. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकार पुढाकार घेत आहे; परंतु (पान ४ वर)

# जलसंधारण : काळाची गरज

कमी पाण्यामध्ये जास्त फायदा घेण्यासाठी शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या उपाययोजना आपल्या शेतीमध्ये करणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतीमधील पिकांमध्ये तसेच उत्पादनामध्ये प्रचंड वाढ होऊ शकते. त्याबरोबरच शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचा काटकसरीने वापर केला जाऊ शकतो व कमी पाण्यात बहारदार शेतीचा प्रयोग करता येऊ शकतो या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या उपाययोजनांचा कल्पकतेनं वापर केला पाहिजे.

मृद व जलसंधारणाच्या पद्धतींचा वापर करताना पाऊसमान, जमिनीचा प्रकार, उतार, जमिनीची खोली आणि जमिनीवरील आच्छादन या बाबी लक्षात घ्याव्यात. ज्या ठिकाणी कमी पाऊस, कमी उतार व कमी खोलीच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी जागच्या जागी पाणी मुरविण्याच्या पद्धतींचा अवलंब करावा. ज्या ठिकाणी जास्त पाऊस आणि जास्त उताराच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी मूलस्थानी जलसंधारणाबरोबर अभियांत्रिकी कामे करून मृद व जलसंधारणाचे उपाय करावेत.

जमिनीच्या उतारानुसार जमिनीचे निरनिराळे भाग करावेत. त्यानुसार बांध टाकावेत, बांधाच्या आतील भागाचे सपाटीकरण करावे. सध्याच्या काळात फुटलेले बांध दुरुस्त करावेत. योग्य ठिकाणी सांडवा ठेवावा. त्यामुळे जादा झालेले पाणी सुरक्षिततरीत्या शेताबाहेर काढता येते. सांडव्यामधून माती वाहून जाऊ नये म्हणून त्यामध्ये दगडी बांध घालावेत. मातीचे बांध पुन्हा पावसाने फुटू नयेत यासाठी पावसाळ्यात त्यावर स्टायलो, मद्रास अंजन, खस, सुबाभूळ, ग्लिरिसिडियाची लागवड करावी.

जमिनीची प्राथमिक मशागत केल्यानंतर पाऊस जागच्या जागी मुरविण्यासाठी मूलस्थानी जलसंधारण पद्धतीचा अवलंब करावा. शेतामध्ये जादा होणारे पाणी शेताबाहेर काढण्यासाठी योग्य ठिकाणी ढाळीचे बांध ठेवावेत. जादा झालेले पाणी हे पाणी वाहून नेणाऱ्या चरामध्ये सोडावे. हा चर गवताने आच्छादित करावा. चराच्या उताराबद्दल काळजी घ्यावी. त्यामुळे जमिनीची धूप होत नाही. शेतातील जादा झालेले पाणी हे योग्य त्या तांत्रिक गोष्टींचा अवलंब करून विहीर किंवा कूपनलिका पुनर्भरणासाठी वापरावे. जादा झालेले पाणी वैयक्तिक किंवा सामूहिक स्तरावर शेततळे खोदून साठवावे. पाऊस, पाणलोट क्षेत्र, जमिनीचा प्रकार, उतार, पीक पद्धती इत्यादींचा विचार करून शेततळ्याचे आकारमान व ठिकाण ठरवावे. पाझर तलाव, बंधारे इत्यादींची साठवणक्षमता अबाधित ठेवण्यासाठी त्यामधील गाळ काढावा, त्यांची दुरुस्ती करावी. मृद व जलसंधारणाच्या पद्धतींचा वापर हा पाऊसमान, जमिनीचा प्रकार, जमिनीचा उतार, जमिनीची खोली आणि जमिनीवरील आच्छादन इत्यादी बाबी लक्षात घेऊन करावा. ज्या ठिकाणी कमी पाऊस, कमी उतार व कमी खोलीच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी जागच्या जागी पाणी मुरविण्याच्या पद्धतींचा अवलंब करावा. ज्या ठिकाणी जास्त पाऊस आणि जास्त उताराच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी मूलस्थानी जलसंधारणाबरोबर अभियांत्रिकी कामे करून मृद व जलसंधारणाचे उपाय करावेत. या पद्धती अत्यंत परिणामकारक आणि कमी खर्चाच्या आहेत. या पद्धतीमध्ये जागच्या जागी जमिनीत पाणी मुरविले जात असल्यामुळे अभियांत्रिकी मृद व जलसंधारण पद्धतीपेक्षा बाष्पीभवन कमी होते.

अवर्षणप्रवण विभागात ८० टक्के क्षेत्र रब्बी पिकाखाली असते. या प्रचलित रब्बी पीकपद्धतीमध्ये पावसाळ्यात म्हणजे खरीप हंगामात बहुधा पीक घेतले जात नाही. त्यामुळे खरीप हंगामात जमिनीस पिकाचे पांघरुण मिळत नाही. रब्बी हंगाम हा पिकांचा दुसरा हंगाम पावसाळ्याच्या शेवटी सुरू होतो. या हंगामात पिकांना प्रत्यक्ष पावसाचे पाणी फारसे मिळत नाही. खरीप हंगामात पडलेले पावसाचे पाणी भारी खोल जमिनीत खरीप पिके न घेता मुरविले जाते आणि जमिनीतील ओलावा वाढविला जातो. अशा जमिनीत रब्बी हंगामातील पिके चांगली येतात. कोरडवाहू शेतीमध्ये जेथे पाणी मुरण्याचा वेग जास्त आहे आणि जमिनीला फारसा उतार नाही, अशा ठिकाणी उताराला आडवे वाफ तयार करावेत. वाफे तयार करताना प्रथम कुळवाची पाळी द्यावी. त्यानंतर बळिराम नांगराने उभे-आडवे ६ मीटर ु ६ मीटर अंतरावर उतारास आडवे सपाट वाफे तयार करावेत. वरंब्याची उंची साधारणपणे २० ते ३० सें.मी. ठेवावी. असे वाफे जागोजागी पाणी मुरविण्यास मदत करतात. त्यामुळे जमिनीमध्ये नेहमीपेक्षा ५० टक्के जास्त ओल साठविली जाते. मध्यम ते भारी जमिनीत बळीराम नांगराने उतारास आडवे तास घालावे. त्यामुळे सऱ्या तयार होतात आणि पडणाऱ्या पावसाचे पाणी सऱ्यांमधून जमिनीत मुरते. या पद्धतीत ८० टक्क्यांपर्यंत पाणी जमिनीत मुरते. जमिनीतून माती वाहून जात नाही. सऱ्यांची लांबी साधारणतः ९० मीटरपर्यंत ठेवावी. या पद्धतीमुळे उत्पादनात ३५ ते ४० टक्के वाढ दिसून येते. या पद्धतीत मुख्य वरंबे उताराला आडवे ठेवावेत, तर बंदिस्त वरंबे उताराच्या दिशेने ठेवावेत. अशा रीतीने उताराला आडवे बंदिस्त सरी वरंबे तयार होतात. मुख्य वरंब्याची उंची ६ मीटर व उंची ३० सें.मी. ठेवावी, तर बंदिस्त वरंब्याची उंची २० सें.मी. व दोन वरंब्यांतील अंतर ३ मीटर ठेवावे. या पद्धतीत जास्त पाऊस पडला तरी बंदिस्त वरंबे फुटून संथ गतीने पाणी शेतातून बाहेर जाते. ही पद्धत कोरडवाहू भागात चोपण व क्षारयुक्त जमिनीत पाणी मुरविण्यासाठी उपयुक्त असून, त्यामुळे जमिनीतील विद्राव्य क्षारांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. मृद व जलसंधारणाची अभियांत्रिकी कामे मूलस्थानी जलसंधारणाच्या कामांबरोबरच मृद व जलसंधारणाचे अभियांत्रिकी उपचार पाणलोट क्षेत्र विकासाच्या माथा ते पायथा या सूत्रानुसार करावेत.

पाणलोट क्षेत्राच्या माथ्यावरील पडीक जमिनीच्या पृष्ठभागावरून वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी सलग समतल चराचा वापर करतात. यासाठी समपातळी रेषेवर ३० सें.मी. खोल व ६० सें.मी. रुंद असे सलग चर खोदावेत. या चरातून निघणारी माती चराच्या खालच्या बाजूस लावावी. त्यामुळे दोन चरांमधील पट्ट्यामध्ये ओलावा दीर्घ काळ राहतो. या ओलाव्याचा फायदा गवताची वाढ चांगल्या प्रकारे होण्यास होते. शिवाय जमिनीवरून वाहून जाणाऱ्या पाण्याचा प्रवाह थांबविला जातो. चराच्या खालच्या बाजूस जो बांध तयार होतो, त्यावर झाडे लावता येतात. तुटक समतल चर हा सलग समतल चरासारखाच असून, यामध्ये समतल चर हा सलग नसून, तुटक स्वरूपात असतो. पावसाचे वाहून जाणारे पाणी जमा करण्यासाठी आणि त्याचा पुन्हा वापर करण्यासाठी पाणलोट क्षेत्रात योग्य ठिकाणी शेततळे खोदावे. जमिनीवरून वाहून जाणारे पाणी शेततळ्याकडे वळविण्यासाठी योग्य ठिकाणी गवत लागवड केलेली चारी तयार करावी. शेततळ्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यास मदत होते. शेततळ्यास योग्य पद्धतीचे अस्तरीकरण केल्यास त्यामध्ये पाणी जास्त काळ साठविता येते. हे साठविलेले पाणी पिकास आणि फळबागेस निकडीच्या अवस्थेत संरक्षित पाणी म्हणून वापरावे. सिमेंट नालाबांधामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा साठा अडवून जवळपासच्या विहिरीतील पाण्याची पातळी वाढते. भूपृष्ठावरून वाहणाऱ्या पाण्याची गती कमी करून थांबविणे, बांधाच्या प्रभाव क्षेत्रातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे आणि त्याद्वारा सिंचन क्षेत्रात वाढ करणे, हे सिमेंट नालाबांधाचे उद्देश आहेत. सिमेंट नालाबांधासाठी जागेची निवड करताना नाल्याची रुंदी ५ ते ३० मी.पर्यंत असावी, तसेच नाल्याचे पाणलोट क्षेत्र ४० हेक्टरपासून १०० हेक्टरपर्यंत असावे. नाल्याच्या दोन्ही बाजूंस स्थिर काठ असावेत. नाल्याच्या तळाचा उतार तीन टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. नाला काठापासून नाल्याच्या तळापर्यंत कमीत कमी दोन मीटर खोली असावी. नालाबांधाच्या क्षेत्रातील जमिनीचा सामू ६.५ ते ८ च्या दरम्यान असावा, जेणेकरून बांधाशेजारची जमीन चिबडयुक्त होणार नाही. नाल्याच्या दोन्ही बाजूंस म्हणजेच बांधाच्या वरील व खालील बाजूस ३० मी. अंतरावर कोठेही वळण किंवा अडथळा नसावा. सिमेंट नालाबांध गाळाने भरू नये म्हणून पाणलोट क्षेत्रात गाळप्रतिबंधक कामे पूर्ण झालेली असावीत. सिमेंट नाला बंधाऱ्याची साठवणक्षमता अबाधित राखण्यासाठी दर पाच वर्षांनी गाळ काढावा.

# साक्षरता : विकासाच्या प्रत्येक दाराची किल्ली

**माणसाच्या** हातात लेखणी आली आणि त्याने आपल्या अनुभवांना शब्दबद्ध करण्यास सुरुवात केली, तेव्हापासून मानवी संस्कृतीच्या विकासाला नवी दिशा मिळाली. पिढ्यानपिढ्या मिळिवलेले ज्ञान जतन करणे, अनुभवांची देवाणघेवाण करणे, विचार व्यक्त करणे आणि पुढील पिढीला ज्ञान हस्तांतरित करणे यासाठी अक्षरांचे सामर्थ्य मानवाने ओळखले. म्हणूनच साक्षरता ही केवळ वाचता-लिहिता येण्याची क्षमता नसून मानवी सभ्यतेच्या प्रगतीचा पाया आहे. अक्षरज्ञानामुळे माणूस माहितीच्या जगाशी जोडला जातो; परंतु माहितीचे आकलन, तिचे परीक्षण, योग्य निर्णयक्षमता आणि ज्ञानाचा जीवनात उपयोग करण्याची क्षमता विकसित झाली की साक्षरतेला खरा अर्थ प्राप्त होतो. ८ सप्टेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक साक्षरता दिन याच व्यापक जाणिवेचा जागतिक संदेश देतो. प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची समान संधी मिळावी, निरक्षरतेमुळे निर्माण होणारे सामाजिक आणि आर्थिक अडथळे दूर व्हावेत आणि ज्ञानाच्या माध्यमातून व्यक्ती अधिक स्वावलंबी, सजग व सक्षम व्हावी, हा या दिनाचा मूलभूत हेतू आहे.

जागतिक साक्षरता दिनाची संकल्पना साक्षरतेला मानवी विकासाच्या केंद्रस्थानी आणण्याच्या प्रयत्नातून पुढे आली. ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन म्हणून निश्चित करण्यात आला आणि त्यानंतर जगभरात साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी विविध उपक्रम सुरू झाले. निरक्षरतेचा प्रश्न केवळ शिक्षणाच्या क्षेत्रापुरता मर्यादित नसतो. निरक्षर व्यक्तीला अनेकदा रोजगाराच्या संधींपासून, आर्थिक व्यवहारांपासून, शासकीय योजनांच्या लाभापासून आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेतील सहभागापासून दूर राहावे लागते. त्यामुळे साक्षरता ही व्यक्तीच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय सक्षमीकरणाशी संबंधित आहे. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीला स्वतःच्या जीवनावर अधिक नियंत्रण मिळते आणि परावलंबित्व कमी होते. म्हणूनच साक्षरता ही मानवी प्रतिष्ठेचा आणि सामाजिक न्यायाचा महत्त्वाचा आधार मानला पाहिजे.

निरक्षर व्यक्तीच्या जीवनातील अडचणी अनेकदा आपल्या लक्षात येत नाहीत. एखाद्या शासकीय कार्यालयात अर्ज भरताना दुसऱ्याची मदत घ्यावी लागणे, बँकेत व्यवहार करताना कागदपत्रांवर काय लिहिले आहे हे समजत नसणे, औषधांच्या वापराच्या सूचना वाचता न येणे, सार्वजनिक वाहतुकीवरील सूचना समजण्यात अडचण येणे किंवा स्वतःच्या हक्कांशी संबंधित माहिती वाचता न येणे या गोष्टी व्यक्तीच्या स्वावलंबनावर मर्यादा आणतात. साक्षर झाल्यानंतर मात्र हीच व्यक्ती स्वतः माहिती वाचू शकते, प्रश्न विचारू शकते आणि स्वतःच्या निर्णयांवर विश्वास ठेवू शकते. म्हणून साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळखणे नव्हे, तर स्वतःच्या जीवनातील निर्णय स्वतः घेण्याची क्षमता विकसित करणे होय.

भारताच्या संदर्भात साक्षरतेचा प्रश्न अधिक व्यापक आहे. विविध भाषा, संस्कृती, भौगोलिक प्रदेश, सामाजिक स्तर आणि आर्थिक परिस्थिती असलेल्या भारतात शिक्षणाच्या संधी सर्वांपर्यंत समान प्रमाणात पोहोचविणे हे मोठे आव्हान राहिले आहे. स्वातंत्र्याच्या वेळी निरक्षरतेचे प्रमाण मोठे होते. ग्रामीण भाग, दुर्गम प्रदेश, महिला, आदिवासी समाज, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सामाजिकदृष्ट्या वंचित समूह यांच्यासाठी शिक्षणाच्या संधी मर्यादित होत्या. स्वातंत्र्यानंतर शासनाने शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी अनेक योजना आणि कार्यक्रम राबविले. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, प्रौढ साक्षरता, सर्वसमावेशक शिक्षण आणि शिक्षणाच्या अधिकाराच्या माध्यमातून समाजातील अधिकाधिक घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रयत्नांमुळे साक्षरतेच्या क्षेत्रात प्रगती झाली असली तरी शिक्षणाची गुणवत्ता आणि समान उपलब्धता हा प्रश्न अजूनही महत्त्वाचा आहे. साक्षरतेच्या चळवळीमध्ये महिला शिक्षणाला विशेष महत्त्व आहे. स्त्री साक्षर झाली की तिच्या जीवनातच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. शिक्षित महिला आपल्या आरोग्याबाबत अधिक जागरूक असते, मुलांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहते, कुटुंबातील आर्थिक व्यवहार समजून घेते आणि सामाजिक प्रश्नांवर स्वतंत्र मत व्यक्त करण्याची क्षमता विकसित करते. शिक्षणामुळे महिलांच्या आत्मविश्वासात वाढ होते आणि निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढतो. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाकडे खर्च म्हणून नव्हे, तर समाजाच्या भविष्यातील विकासासाठीची गुंतवणूक म्हणून पाहण्याची गरज आहे. एका मुलीला शिक्षण मिळाले तर तिच्या माध्यमातून पुढील पिढ्यांपर्यंत ज्ञान आणि जागरूकतेचा वारसा पोहोचू शकतो.

प्रौढ साक्षरतेचे महत्त्वही कमी नाही. बालपणी शिक्षण घेता आले नाही म्हणून व्यक्तीच्या शिकण्याच्या शक्यता संपत नाहीत. जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर शिक्षण घेण्याचा अधिकार प्रत्येकाला असला पाहिजे. अनेक प्रौढ व्यक्तींना गरिबी, रोजगार, कौटुंबिक जबाबदाऱ्या, स्थलांतर किंवा सामाजिक परिस्थितीमुळे औपचारिक शिक्षण घेता आलेले नसते. अशा व्यक्तींसाठी त्यांच्या वेळेनुसार आणि जीवनाशी संबंधित विषयांवर आधारित शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रौढ व्यक्ती साक्षर झाली की ती शासनाच्या योजनांचा लाभ अधिक सहजपणे घेऊ शकते, आर्थिक व्यवहार समजून घेऊ शकते, मुलांच्या शिक्षणात सहभागी होऊ शकते आणि समाजातील विविध प्रक्रियांमध्ये अधिक आत्मविश्वासाने भाग घेऊ शकते. म्हणून प्रौढ साक्षरता ही समाजाच्या विकासाची महत्त्वाची गुंतवणूक आहे.

आज साक्षरतेच्या पारंपरिक संकल्पनेपलीकडे जाण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. केवळ अक्षर ओळखणे किंवा सही करणे ही साक्षरतेची अंतिम पायरी मानता येणार नाही. एखादी व्यक्ती वाचलेली माहिती समजून घेते का, तिच्या संदर्भाचा विचार करते का, योग्य-अयोग्य माहितीमधील फरक ओळखते का आणि मिळालेल्या ज्ञानाचा आपल्या जीवनात उपयोग करू शकते का, हे महत्त्वाचे आहे. म्हणून आज 'कार्यक्षम साक्षरता' ही संकल्पना अधिक महत्त्वाची ठरते. वाचन, लेखन आणि गणित या मूलभूत कौशल्यांचा उपयोग प्रत्यक्ष जीवनातील समस्या सोडविण्यासाठी करता येणे आवश्यक आहे. साक्षरता जीवनाशी जोडली गेली तरच ती व्यक्तीच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती देऊ शकते. डिजिटल क्रांतीमुळे साक्षरतेचे स्वरूप आणखी बदलले आहे. मोबाईल दूरध्वनी, संगणक आणि इंटरनेटने माहिती मिळिवण्याची प्रक्रिया अतिशय सोपी केली आहे. काही क्षणांत जगाच्या कोणत्याही भागातील माहिती आपल्या हातात येते. परंतु माहितीचा वेग वाढला तसाच चुकीच्या माहितीचा प्रसारही वाढला आहे. सामाजिक माध्यमांवर फिरणारी प्रत्येक माहिती खरी असेलच असे नाही. खोट्या बातम्या, अफवा, बनावट संदेश, दिशाभूल करणारे दावे आणि आर्थिक फसवणुकीचे प्रकार नागरिकांसमोर नवी आव्हाने निर्माण करीत आहेत. त्यामुळे डिजिटल साधनांचा वापर करता येणे पुरेसे नसून माहितीची सत्यता तपासणे, विश्वासार्ह स्रोत ओळखणे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. डिजिटल साक्षरता ही आधुनिक साक्षरतेची अनिवार्य बाजू बनली आहे.

आर्थिक व्यवहारांचे वाढते डिजिटलीकरण पाहता आर्थिक साक्षरतेचे महत्त्वही वाढले आहे. बचत, बँक खाते, कर्ज, विमा, व्याज, डिजिटल व्यवहार आणि आर्थिक नियोजन याबाबत मूलभूत माहिती प्रत्येक नागरिकाला असणे आवश्यक आहे. आर्थिक अज्ञानामुळे अनेकदा व्यक्ती फसवणुकीला बळी पडते किंवा चुकीचे आर्थिक निर्णय घेते. त्यामुळे साक्षरतेचा अर्थ आर्थिक स्वावलंबनाशी जोडणे आवश्यक आहे. स्वतःच्या पैशांबाबत योग्य निर्णय घेता येणे ही व्यक्तीच्या आत्मनिर्भरतेची महत्त्वाची खूण आहे. त्याचप्रमाणे आरोग्यविषयक माहिती समजणे, औषधांच्या सूचना वाचणे, आरोग्यविषयक अफवांपासून सावध राहणे आणि योग्य वेळी आरोग्यसेवा घेणे यासाठी आरोग्य साक्षरता आवश्यक आहे. साक्षरता आणि लोकशाही यांचे नाते अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांना केवळ मतदानाचा अधिकार असणे पुरेसे नसते. शासनाच्या योजना, कायदे, सार्वजनिक प्रश्न आणि नागरिकांचे हक्क व कर्तव्ये यांची माहिती असणे आवश्यक असते. साक्षर नागरिकाला माहिती वाचता येते, तिचे परीक्षण करता येते आणि आपल्या मताची निर्मिती करता येते. त्यामुळे साक्षरता ही लोकशाहीतील अर्थपूर्ण सहभागाची पायाभरणी करते. विवेकी नागरिक समाजातील प्रश्नांवर विचार करू शकतो, सार्वजनिक संस्थांना प्रश्न विचारू शकतो आणि आपल्या अधिकारांसाठी कायदेशीर व लोकशाही मार्गाने प्रयत्न करू शकतो. म्हणून साक्षरता ही केवळ वैयक्तिक विकासाची बाब नसून लोकशाहीच्या सुदृढीकरणाचे साधन आहे.

साक्षरतेबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हीदेखील काळाची गरज आहे. माहितीच्या युगात अंधश्रद्धा, अफवा आणि अप्रमाणित दावे वेगाने पसरू शकतात. एखादी गोष्ट ऐकली किंवा सामाजिक माध्यमावर पाहिली म्हणून ती खरी मानण्याऐवजी तिच्यामागील तथ्य तपासण्याची सवय लागणे आवश्यक आहे. प्रश्न विचारणे, पुराव्याचा शोध घेणे, तर्कशुद्ध विचार करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे ही शिक्षणाची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. अक्षरज्ञान जर विवेकाला जन्म देत नसेल तर साक्षरतेचे व्यापक सामाजिक उद्दिष्ट अपूर्ण राहते. त्यामुळे साक्षरतेपासून ज्ञानाकडे आणि ज्ञानापासून विवेकाकडे जाणारा प्रवास घडविणे आवश्यक आहे.

वाचनसंस्कृती ही साक्षर समाजाची खरी ओळख आहे. परीक्षा आणि पदवीपुरते वाचन मर्यादित राहिले तर साक्षरतेची क्षमता संकुचित होते. पुस्तकांशी मैत्री असलेला समाज अधिक विचारशील, संवेदनशील आणि चिकित्सक बनतो. साहित्य, इतिहास, विज्ञान, समाजशास्त्र, चरित्रे, वर्तमानपत्रे आणि विविध ज्ञानशाखांतील ग्रंथ यांचे वाचन व्यक्तीच्या विचारविश्वाचा विस्तार करते. आज डिजिटल माध्यमे मोठ्या प्रमाणावर वापरली जात असली तरी पुस्तकांचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट माहितीच्या वेगवान प्रवाहात सखोल वाचनाची गरज अधिक वाढली आहे. घराघरांत वाचनाची सवय, शाळांमध्ये समृद्ध ग्रंथालये आणि गावागावांत सार्वजनिक वाचनालये निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे. साक्षरतेच्या प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शिक्षक हा विद्यार्थ्याला केवळ पाठ्यपुस्तकातील माहिती देणारा नसून विचार करण्याची दृष्टी देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांच्या मनात प्रश्न निर्माण करणे, त्यांच्या अनुभवांना शिक्षणाशी जोडणे, वाचनाची आवड निर्माण करणे आणि ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध स्पष्ट करणे ही शिक्षकाची मोठी जबाबदारी आहे. आज शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना शिक्षकाची भूमिका कमी होत नसून अधिक महत्त्वाची होत आहे. माहिती सहज उपलब्ध करून देण्यापेक्षा त्या माहितीचे आकलन, विश्लेषण आणि योग्य उपयोग करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट ठरले पाहिजे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील साक्षरतेचा प्रश्नही गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. शाळेपर्यंत पोहोचण्याची अडचण, आर्थिक परिस्थिती, स्थलांतर, डिजिटल साधनांचा अभाव आणि कुटुंबातील जबाबदाऱ्या यांमुळे काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होतात. अशा परिस्थितीत शाळेत प्रवेश मिळणे ही पहिली पायरी आहे; परंतु विद्यार्थी शाळेत टिकून राहतो का आणि त्याला अपेक्षित ज्ञान व कौशल्ये मिळतात का, हे अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षणातील सामाजिक आणि डिजिटल दरी कमी केल्याशिवाय साक्षरतेचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाही. ग्रामीण भागातील शाळा, शिक्षक, ग्रंथालये, डिजिटल सुविधा आणि समुदायाचा सहभाग यांना अधिक बळ देणे आवश्यक आहे. रोजगाराच्या बदलत्या स्वरूपामुळे साक्षरतेसोबत कौशल्याधारित शिक्षणाची गरज वाढली आहे. आजच्या युवकाला केवळ प्रमाणपत्र नव्हे, तर बदलत्या कामाच्या जगाशी जुळवून घेण्याची क्षमता आवश्यक आहे. संगणकाचे प्राथमिक ज्ञान, संवादकौशल्य, आर्थिक व्यवहारांची समज, समस्या सोडविण्याची क्षमता आणि नवीन कौशल्य शिकण्याची तयारी या गोष्टी रोजगारक्षमतेत भर घालतात. ग्रामीण युवकांसाठी स्थानिक संसाधनांवर आधारित व्यवसाय, लघुउद्योग, शेतीपूरक उद्योग आणि स्वयंरोजगाराच्या संधींचे ज्ञान उपलब्ध करून दिल्यास साक्षरतेचा आर्थिक विकासाशी थेट संबंध निर्माण होऊ शकतो.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचे आणि रोजगाराचे स्वरूप आणखी बदलणार आहे. या बदलांच्या काळात साक्षरतेचा अर्थ तंत्रज्ञान समजून घेणे आणि त्याचा विवेकी उपयोग करणे असा अधिक व्यापक होईल. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून निर्माण झालेली माहिती योग्य आहे का, तिचा स्रोत काय आहे, तिचा उपयोग कोणत्या मर्यादेत करावा आणि मानवी विवेकाची भूमिका काय असावी, याचे भान निर्माण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी मानवी मूल्ये, संवेदनशीलता, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व कायम राहणार आहे.

साक्षरतेचा प्रसार ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. शासनाने आवश्यक धोरणे, सुविधा आणि आर्थिक संसाधने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे; परंतु समाजाचा सहभाग त्याला दिशा देतो. शिक्षक, पालक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्रितपणे साक्षरतेला सामाजिक चळवळीचे स्वरूप दिले पाहिजे. एखाद्या निरक्षर व्यक्तीला अक्षरज्ञान देणे, एखाद्या मुलाला शिक्षणात टिकवून ठेवण्यासाठी मदत करणे, एखाद्या महिलेला डिजिटल व्यवहार शिकविणे किंवा एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीला आवश्यक माहिती समजावून सांगणे या छोट्या कृती समाजपरिवर्तनाच्या मोठ्या प्रक्रियेला हातभार लावू शकतात. साक्षरता ही एकदाच पूर्ण होणारी प्रक्रिया नाही. जग सतत बदलत आहे आणि त्या बदलांसोबत शिकण्याची गरजही सतत निर्माण होत आहे. त्यामुळे 'आयुष्यभर शिक्षण' ही संकल्पना साक्षरतेचा पुढील टप्पा आहे. बालकापासून ज्येष्ठ नागरिकापर्यंत प्रत्येक व्यक्तीला नव्या ज्ञानाशी जोडण्याची संधी मिळाली पाहिजे. व्यक्तीने नवे कौशल्य शिकले, वाचनाची सवय ठेवली, तंत्रज्ञान समजून घेतले आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेतले तर तिची साक्षरता अधिक अर्थपूर्ण होते. शिक्षणाची प्रक्रिया शाळेच्या भिंतींपलीकडे आणि पदवीच्या प्रमाणपत्रापलीकडे नेण्याची गरज आहे.

जागतिक साक्षरता दिनाच्या निमित्ताने म्हणूनच साक्षरतेच्या पारंपरिक चौकटीपलीकडे पाहणे आवश्यक आहे. आज आपल्याला केवळ अक्षर ओळखणारे नागरिक नकोत, तर माहिती समजून घेणारे, विवेकाने निर्णय घेणारे, वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणारे, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणारे, आर्थिकदृष्ट्या सजग आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील नागरिक घडवायचे आहेत. साक्षरता व्यक्तीला माहिती देते; शिक्षण त्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करते; विवेक त्या ज्ञानाला योग्य दिशा देतो आणि सामाजिक जबाबदारी त्या ज्ञानाचा समाजहितासाठी उपयोग करण्याची प्रेरणा देते. हा संपूर्ण प्रवासच साक्षरतेचा खरा अर्थ स्पष्ट करतो.

८ सप्टेंबरचा जागतिक साक्षरता दिन हा त्यामुळे केवळ एक औपचारिक दिनविशेष न राहता समाजाच्या आत्मपरीक्षणाचा दिवस ठरला पाहिजे. आपल्या आजूबाजूला अजून कोण शिक्षणापासून दूर आहे, कोणाला वाचन-लेखनाची अडचण आहे, कोणाला डिजिटल साधनांचा वापर करता येत नाही, कोणाला आर्थिक व्यवहारांची माहिती नाही किंवा कोणाला आपल्या अधिकारांची जाणीव नाही, याचा विचार करण्याची गरज आहे. साक्षरतेचे यश केवळ आकडेवारीत नसते; ते व्यक्तीच्या बदललेल्या जीवनात दिसते. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःचे नाव वाचते, स्वतःचा अर्ज भरते, स्वतःचा आर्थिक व्यवहार करते, आपल्या मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेते आणि आपल्या हक्कांसाठी आत्मविश्वासाने उभी राहते, तेव्हा साक्षरतेचा खरा विजय होतो. अक्षर लहान असते; परंतु त्यातून निर्माण होणारी शक्ती अफाट असते. अक्षरातून शब्द, शब्दातून विचार, विचारातून विवेक आणि विवेकातून परिवर्तन जन्माला येते. म्हणून साक्षरतेचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे ही केवळ शैक्षणिक गरज नाही, तर सामाजिक न्यायाची आणि राष्ट्रनिर्मितीची आवश्यकता आहे. समाजातील कोणताही घटक ज्ञानापासून वंचित राहू नये, प्रत्येकाला शिकण्याची संधी मिळावी आणि प्रत्येक व्यक्तीला आपल्या ज्ञानाच्या बळावर सन्मानाने जगता यावे, हेच साक्षरतेचे अंतिम ध्येय असले पाहिजे. अक्षरज्ञानातून स्वावलंबन, स्वावलंबनातून आत्मविश्वास, आत्मविश्वासातून सहभाग आणि सहभागातून परिवर्तन हा साक्षरतेचा खरा प्रवास आहे. या प्रवासात एकही व्यक्ती मागे राहू नये, प्रत्येक मनात शिकण्याची जिज्ञासा निर्माण व्हावी आणि ज्ञानाची ज्योत पिढ्यानपिढ्या तेवत राहावी, हाच जागतिक साक्षरता दिनाचा खरा संदेश आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# प्रार्थनेसोबत पुरुषार्थ आवश्यक; मोक्ष प्रयासानेच प्राप्त होतो – आचार्य हेमसागरजी महाराज


छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – मनातील वासनेचा विकार निघून जाणे म्हणजे निर्वाण, तर मोहापासून दूर राहणे म्हणजे मोक्ष होय. मोक्ष ही वडिलोपार्जित संपत्ती नसून तो आपल्या कर्माने, श्रमाने आणि पुरुषार्थाने प्राप्त करावा लागतो. केवळ प्रार्थना करून नव्हे, तर प्रार्थनेसोबत प्रयत्नांची जोड दिली तरच जीवनात यश आणि आध्यात्मिक प्रगती साधता येते, असे प्रभावी प्रतिपादन सिद्धांत चक्रवर्ती आचार्य श्री हेमसागरजी महाराज यांनी केले.



आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर येथे चातुर्मासासाठी विराजमान असलेल्या आचार्य श्री हेमसागरजी महाराज यांच्या मंगल सानिध्यात इंद्रध्वज मंडल विधानाचे आयोजन २ सप्टेंबर ते ९ सप्टेंबरदरम्यान करण्यात आले आहे. धार्मिक विधी, अभिषेक, शांतिधारा, पादप्रक्षालन व महाआरतीस भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. इंद्रध्वज विधानामध्ये कुबेर इंद्र होण्याचे सौभाग्य प्रशांत शातिलाल साहूजी यांना मिळाले. शांतिधारेचे सौभाग्य श्रीमती हेमलता, दिनेशजी, सतीशजी, सुनीलजी व संतोषजी सेठी परिवाराला लाभले. आचार्य श्री हेमसागरजी महाराज यांच्या पादप्रक्षालनाचे सौभाग्य श्रीमती कुंकुमदेवी, संजयजी, विजयजी, प्रशांतजी, अजयजी, पियुषजी, जिनेशजी पापडीवाल परिवाराला मिळाले. तर महाआरतीचे सौभाग्य दीपचंदजी, संजयकुमारजी, जीवनकुमारजी, प्रशांतकुमारजी, परेशकुमारजी, अमोलजी तसेच सौ. आकांक्षा व अर्पलजी पाटनी परिवार (अंधारीवाला), सुराणानगर, छत्रपती संभाजीनगर यांना लाभले. यावेळी मार्गदर्शन करताना आचार्य श्री हेमसागरजी महाराज म्हणाले की, भगवान महावीरांनी दिलेली संस्कृती ही श्रमण संस्कृती म्हणून ओळखली जाते. श्रमण संस्कृतीचा अर्थच असा आहे की, जीवनात जे काही प्राप्त करायचे आहे ते श्रम आणि पुरुषार्थाने मिळवावे. तुम्ही जिथे पोहोचाल, तिथे तुमच्या श्रमाने पोहोचाल. मोक्ष प्रसादातून मिळत नाही, तर प्रयासातून मिळतो. भगवान महावीर केवळ प्रार्थनेने नव्हे, तर प्रयत्नाने प्राप्त होतील. परमेश्वर केवळ पूजा केल्याने मिळत नाही, तर पुरुषार्थ केल्याने त्याची अनुभूती होते. त्यामुळे फक्त प्रार्थना ही अपुरी असून, प्रार्थनेसोबत प्रयत्नही आवश्यक आहेत, असे त्यांनी सांगितले. या धार्मिक आयोजनामुळे आर्यनंदी कॉलनी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, दररोज मोठ्या संख्येने श्रावक-श्राविका व भाविक सहभागी होत आहेत. इंद्रध्वज विधानाच्या आयोजनाची माहिती चातुर्मास मुख्य संयोजक संजय पापडीवाल यांनी दिली.

# आचार्य विनम्रसागरजी महाराजांचे केशलोचन संपन्न
## राजाबाजार जैन मंदिरात चातुर्मासानिमित्त धार्मिक वातावरण

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – राजाबाजार येथील जैन मंदिरात चातुर्मासासाठी विराजमान असलेले आचार्य श्री १०८ विनम्रसागरजी महाराज यांचे पवित्र केशलोचन विधी भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाले.



जैन साधुसंतांच्या जीवनातील केशलोचन ही अत्यंत कठोर व आत्मसंयमाची साधना मानली जाते. देहाविषयीची आसक्ती दूर करून आत्म कल्याणाच्या मार्गावर वाटचाल करण्याचा हा एक महत्त्वपूर्ण संस्कार आहे. आचार्यश्रींनी अत्यंत शांत, संयमित आणि निर्विकार भावनेने केशलोचन स्वीकारले.

यावेळी राजाबाजार जैन मंदिर परिसरात मोठ्या संख्येने श्रावक–श्राविका व धर्मप्रेमी उपस्थित होते. भक्तांनी 'आचार्यश्रींचा जयजयकार', 'जय जिनेंद्र' अशा जयघोषाने परिसर दुमदुमून टाकला. केशलोचनाचे दर्शन घेऊन भाविकांनी आचार्यश्रींचे आशीर्वाद घेतले.

चातुर्मासाच्या काळात आचार्यश्रींच्या सान्निध्यात विविध धार्मिक अनुष्ठान, प्रवचन, स्वाध्याय, सामायिक, पूजन व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मोठ्या संख्येने समाजबांधव घेत आहेत. आचार्यश्रींच्या त्याग, तपस्या आणि संयमातून आत्मकल्याणाचा संदेश मिळत असून, चातुर्मासामुळे राजाबाजार जैन मंदिर परिसरात भक्तिमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.तसेच हिराकाका प्रागन येथे ४४दिवशीय कल्याणमंदिर विधान सुरू असून भाविकानी याचा लाभ घ्यावाअसे आवाहन पचायत अध्यक्ष महावीर पाटनी व विश्वस्त मंडळ व विनम्र चातुर्मास समिती २०२६ ने केले आहे.

# 'असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी'

**साधारणपणे** कुठल्याही देशात एखादी दुर्घटना घडली की त्याची चर्चा करताना त्या देशातील तत्कालिक सरकार हे निशाण्यावर असते आणि त्या दुर्घटनेचे खापर सरकारी धोरणांवर फोडले जाते. दुर्घटना नैसर्गिक असो, मानव निर्मित असो, राजकीय असो अथवा सामरिक, कुटनीतिक असो, सरकारच रोषाचा धनी ठरते.

सध्या भारतात मात्र देशाचा जि. डी पी. ७. ८% नी वाढला ही चांगली घटना घडून सुद्धा सरकारवर टीकेचे बाण सोडले जात आहेत आणि सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे. अर्थशास्त्रात 'गिफेन पॅराडॉक्स' प्रसिद्ध आहे तसाच भारतात 'मोदी पॅराडॉक्स' हा नवा सिद्धांत रुजतो आहे. मोदींच्या काळात कितीही चांगले घडले तरी ते वाईट कसे आहे / खोटे कसे आहे हे बिंबवणारी एक 'फौज' मैदानात उतरते. देशाचा वाढता जी. डी पी हे त्याचे ताजे उदाहरण आहे. असो.

राजकीय चर्चा करणे हा या लेखाचा हेतू नाही तसेच आकडेवारीवर काथ्याकूट करणे हाही उद्देश नाही. सर्वसामान्यपणे आपल्या डोळ्याला जे दिसत आहे ते जाहीर झालेल्या आकडेवारीशी सुसंगत आहे किंवा नाही एवढाच मर्यादित हेतू आहे. त्यासाठी काही वास्तव उदाहरणे देणे आवश्यक ठरते.

ज्या दिवशी जी. डी. पी.चा आकडा जाहीर झाला त्याच दिवशी 'प्रवासी वाहनांची खरेदी सुसाट' अशी बातमी वाचनात आली. या बातमीचा प्रत्यय देणाऱ्या काही उदाहरणांचा उल्लेख करतो. ही उदाहरणे ग्रामीण भागातील अल्पशिक्षित /अशिक्षित व्यक्तींबद्दल आहेत.

एक व्यक्ती रेल्वेमध्ये कंत्राटी सफाई कामगार आहे.त्याला मासिक वेतन किती असेल याची सर्वांना कल्पना येईल.तो या नोकरीबरोबरच रंगकाम करणे वगैरे जोडधंदा करतो. तो अल्प भूधारकही आहे. या व्यक्तीने नुकतीच एक नवीन गाडी घेतली, कदाचित ती सेकंड हॅन्ड असू शकेल.

दुसरे उदाहरण आहे. एका तरुण मुलाचे. त्याच्या ४ पिढ्या त्यांच्या मूळ गावीच राहिल्या आहेत. त्याने आठवीनंतर शाळा सोडली आणि वंशपरंपरागत फॅब्रिकेशनच्या धंद्यात ऑन जॉब ट्रेनिंग घेतले. त्याने जोडीला इलेक्ट्रिक काम पण शिकून घेतले. त्याची थोडी भातशेती सुद्धा आहे. त्याला कामासाठी बोलावले तेव्हा त्याने सांगितले की आज येऊ शकणार नाही कारण नवीन चारचाकीची 'डिलिव्हरी' मिळणार आहे.

तिसरे उदाहरण दुष्काळी भागातील आहे. सदर तरुणाने शिक्षणात रस नसल्याने पाचवीत शाळा सोडली. तोही फॅब्रिकेशनचे काम करतो तसेच 'सिविल' कामही करतो. आज त्याच्याकडे दोन दुचाकी तसेच दोन चार चाकी गाड्या आहेत. शेती तर आहेच.मी त्याला विचारले की दुष्काळी भाग आहे तर शेतीला पाणी कसे व कुठून मिळते? त्याने सांगितले की फडणवीस सरकारने गेली अनेक वर्षे रखडलेली पाणी पुरवठा योजना मार्गी लावली त्याचा फायदा झाला आहे.

चौथे उदाहरण आहे ते एका शहरात व्यवसाय करणाऱ्या ड्राइव्हरचे. हा मूळचा विदर्भाचा आहे. गावाकडे सोयाबीन व कापसाची शेती आहे. पुण्यात त्याच्या २ टुरिस्ट गाड्या आहेत.प्रत्येक महिन्यात किमान २५ दिवस त्याला भाडे मिळतेच. जवळजवळ रोज मुंबई एअरपोर्टसाठी भाडे असते. त्याने नुकतेच २० लाखाचे घर पुण्यात खरेदी केले (अर्थात बँकेचे हौसिंग लोन घेऊन ). त्याच्या गाडीच्या उत्पन्नाच्या जोरावर त्याने ठरलेल्या हप्त्याव्यतिरिक्त २०, ००० अधिक हप्ता भरला. त्याला हौसिंग लोन लौकर फेडायचे आहे.

घरात काम करणाऱ्या मोलकरणींचे उदाहरण घ्या. पूर्वी बसचे भाडे ५ पैशानी वाढले तरी ते त्यांना परवडत नव्हते. त्या पायी चालत असत. आज कित्येक जणी सेकंड हॅन्ड स्कूटर विकत घेऊन त्यावरून कामावर वेळेत हजर होतात.

पेट्रोलचे दर सारखे बदलत असतात हे त्यांना माहित आहे तरी त्या स्कूटर खरेदी करतात कारण पेट्रोलचे वाढीव दर पेलण्याइतकी त्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे.

मुंबईतील एका माथाडी कामगाराला सरासरी २५ ०००रुपये मासिक वेतन मिळते.अशाच एका कामगाराचा मुलगा आज पदवीधर होत असल्याचे पाहण्यात आले आहे.

वरील उदाहरणे केवल प्रतिनिधिक आहेत आणि माझ्या मर्यादित विश्वातील आहेत.पण ती बरेच काही सांगून जातात. एक तर हे सर्व जण स्वयंरोजगार मिळवणारे आहेत. ते नोकरी करत नाहीत म्हणजे तांत्रिक दृष्ट्या 'बेरोजगार ' आहेत. सर्व जण अल्पशिक्षित आहेत.

पूर्ण कुटुंब पोसले जाईल एवढे उत्पन्न शेतीतून मिळत नाही तरी सुद्धा ते स्वतःच्या पायावर उभे आहेत. हे कशाचे लक्षण आहे?

गेल्या दहा वर्षात राज्यकर्त्यांनी ज्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत त्याची फळे आता मिळू लागली आहेत. ( जे लोकं 'पी हळद आणि हो गोरी अशी अपेक्षा ठेवतात तेच जास्ती आरडाओरड करतात.) परिणामी जनतेची क्रयशक्ती वाढली आहे आणि त्यामुळे मागणीत वाढ झाली आहे. मागणी वाढल्यामुळे पुरवठाही वाढला आहे.

अनेक महामार्ग, रस्ते यांचे जाळे निर्माण केले गेले आहे त्यामुळे वाहतूक जलद झाली आहे.मालगाड्यांसाठी 'freight corridors ' निर्माण केल्याने मालवाहतुकीत होणारा वेळेचा अपव्यय टळला आहे. Freight corridors निर्माण करण्याचे काम 'कोविडच्या' कालखंडात केले गेले त्यामुळे कोणाचेच लक्ष तिकडे गेले नाही.

रेल्वेचे विद्युतीकरण झाल्याने 'डिझेलची' मागणी मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. हॉर्मुझची खाडी बंद पडली तरी इतर sources डेव्हलप केल्याने आज भारतात इंधनाच्या किंमती स्थिर राहिल्या आहेत.

भारताच्या मध्यमवर्गाच्या हातातही पैसा खुळखुळू लागला आहे.मध्यमवर्ग हा आजच्या भारतीय पर्यटन उद्योगाचा कणा बनला आहे.

सोने, चांदीच्या मागणी किंमती कितीही वाढल्या तरी घट होताना दिसत नाही. थोड्यात सोने चांदीची मागणी आता ळपशश्रीलळ झाली आहे.

महिला बचत गटांना प्रोत्साहन दिल्यामुळे महिला सुद्धा आता पैशाचा वापर वस्तू निर्मिती साठी करू लागल्या आहेत. 'लखपती दीदी' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. स्वयंरोजगारामुळे देशाच्या सकल उत्पादनात किती वाढ झाली आहे याची आकडेवारी निदान माझ्या तरी वाचण्यात आलेली नाही. जाणकारांनी यावर प्रकाश टाकला तर बरे होईल. आपल्याकडे मोठ्या उद्योग धंद्याचे कॉंट्रिब्युशन किती आहे एवढ्या पुरताच विचार केला जातो.तसेच एका आर्थिक वर्षात किती स्वयंरोजगार निर्माण झाले त्याचीही आकडेवारी उपलब्ध नसते.

वर्तमानात व भविष्यात नवीन नोकऱ्या निर्माण होण्याचे प्रमाण कमी होत जाणार आहे कारण माहिती तंत्रज्ञानाचा होत असलेला विस्फोट. ए. आय. मित्र की शत्रू असा वाद आता रंगणार आहे. तेव्हा स्वयंरोजगार निर्माण होणे हाच बेरोजगारीवरील दीर्घकालीन उत्तर असणार आहे. भारताच्या सकल उत्पादनात नोंदली जाणारी वाढ हे वास्तव आहे आणि ती समजण्यासाठी 'असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी ' असे म्हटले तर वावगे ठरू नये.

–रघुनंदन भागवत

# विद्यार्थ्यांनो अभ्यासाला 'ओझे' समजू नका

वैजापूर/कोपरगाव, दि. ७ (प्रतिनिधी) – शालेय व महाविद्यालयीन शैक्षणिक जीवन विद्यार्थी जीवनाला सुसंस्कृत बनवून जीवनाचे उच्च ध्येय गाठण्यासाठी सहाय्यभूत ठरते, जीवनात आनंद व उत्साह पेरते वास्तव विद्यार्थ्यांनी अभ्यासाला कदापीही 'ओझे'न समजता अभ्यास हे जीवनाचे अंगभूत साधन समजून आनंददायी शिक्षण घ्यावे व जीवन घडवावे असे प्रतिपादन सोमवार (ता,०७) रोजी सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी व मराठवाड्याचे संत कवी व साहित्यिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण येथील सहावी ते दहावी च्या विद्यार्थ्यांशी 'अभ्यास कसा करावा' या विषयी संवाद साधतांना केले.ते पुढे म्हणाले की, 'वाचन, लेखन, संभाषण किंवा श्रवण हे अभ्यासाच्या




पायऱ्या असू शकतात पण वरील पायऱ्या म्हणजे अभ्यास नाही तर, विद्यार्थ्यांनी आपल्या क्रमिक पुस्तकातील पाठ, प्रकरण, कविता तसेच गणितीय व वैज्ञानिक विषयांचा सखोल अभ्यास करून त्यातील व्यवहारिकता दैनंदिन जीवनात उतरवून एक आदर्श विद्यार्थी, कर्तव्यदक्ष नागरिक बनणे, शुद्ध व निर्मळ चारित्र्य जपणे हा खरा अभ्यास होय'. या प्रसंगी अध्यक्षस्थानी या समता इंटरनॅशनल इंग्लिश माध्यमाच्या शाळेचे प्राचार्य समीर अत्तार होते. संस्थेचे संस्थापक ओम प्रकाश दादापा तथा काका कोयटे यांनी धोंडीरामसिंह राजपूत यांना निमंत्रित करून विद्यार्थी संवाद घडवून आणला.

# जीवनात प्रामाणिकतेला महत्व देणारे-संत सेना महाराज

**देशात** अनेक संत होऊन गेलेले आहेत. त्यांच्या अमृत तुल्य अभंग व वाणीतून सामाजिक मनं विधायक आणि रचनात्मक कार्य करीत आलेली आहेत. आज समाजात जे सामाजिक संबंध दिसून येतात जी सामाजिक स्थिरता दिसते ती संत -महंत यांच्या समाज प्रबोधनानेच होय.

संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांच्या सम कालीन मानल्या जात असलेले संत म्हणजे संत सेना महाराज होत. संत सेना महाराज वारकरी संप्रदायातील थोर संत होत. ते विठ्ठलाचे निस्सिम भक्त होते. त्यांना 'सेना न्हावी सेनानी-सेना महाराज या नावाने ओळखल्या जाते.संत सेना महाराजांचा संबंध मध्य प्रदेशातील बांधवगड या प्रदेशाशी असल्याचा उल्लेख आढळतो. ते बांधवगड राजाच्या सेवेत होते.त्यांनी आपल्या अभंग रचनेतून विशद केलेले आहे की, सम ाजातील व्यक्तींनी आपले कर्तव्य



प्रामाणिक पणे करत असताना ईश्वर भक्ती करावी, यातून मनस्वी आनंद मिळतो, असे ते मानत. व्यक्तींनी आपल्या जीवनातील अहंकार, मोह,स्वार्थ या बाबी समूळ काढून टाकाव्यात, प्रामाणिकपणे कर्तव्य करून जीवन जगावे यातच खरी ईश्वरभक्ती आहे. त्यांच्या भक्ती परंपरेचा प्रभाव महाराष्ट्र बरोबर उत्तर भारतातही दिसून येतो.त्यांच्या नावाशी संबंधित एक पद गुरू ग्रंथ साहिब या ग्रंथात समाविष्ट आहे. ते लोकांना उपदेश करीत की कर्म करताना मनात भक्ती ठेवावी,अहंकाराचा त्याग करावा,सर्व मानव जातिकडे समानतेने पहावे , भगवंत नामस्मरण आणि सदाचाराने जीवन जगावे ,असा त्यांचा उपदेश असे.त्यांनी आपल्या अभंगातून भगवंत नामस्मरण, समता, सदाचार, अहंकार त्याग आणि मनाची शुद्धता याचा संदेश दिला.अशा या थोर संतांच्या स्मृतींना कोटी! कोटी!!वंदन.

– धोंडीरामसिंह राजपूत

## अमेरिकेतही एसआयआर, भारतीय वंशाच्या दहा लाख मतदारांची नावे हटवणार

वॉशिंग्टन, दि. ७ (वृत्तसंस्था) – हिंदुस्थान प्रम णेच डोनाल्ड ट्रम्प सरकारने अमेरिकेतही मतदार फेरतपासणी (एसआयआर) सुरु या प्रक्रियेत सध्या अमेरिकेत असलेल्या २६ लाख भारतीय वंशाच्या मतदारांपैकी १० लाख मत वगळली जाण्याची भीती आहे. ट्रम्प सरकारने एसआयआर मोहिमेसाठी १२५ कोटींच्या निधीची गरज आहे.

या अंतर्गत विद्यमान मतदार यादीची तपासणी करून नॅशनल वोटर डेटाबेस तयार केला नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या आधी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे सरकारचे लक्ष्य आहे.

## विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद यांच्या मातोश्री खतीजा बेगम यांचे निधन

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी माजी स्थाई समिती सभापती अब्दुल साजिद (दिवंगत ) यांच्या पत्नी तसेच माजी नगरसेवक अब्दुल सिकंदर व विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद यांच्या मातोश्री श्रीमती खतीजा बेगम अब्दुल साजिद बिल्डर साजिद यांचे दीर्घ आजाराने वयाच्या ६०व्या वर्षी दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात तीन मुले व दोन मुली असा परिवार आहे. त्यांचा नमाज–ए–जनाजा शाहगंज येथील मशिदीत अदा करण्यात आला. त्यानंतर त्यांचा दफनविधी पीरगेब साहेब कब्रस्तान, एस.टी. कॉलनी, फाजलपुरा येथे करण्यात आला. या दुःखद प्रसंगी साजिद कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून, नातेवाईक, मित्रपरिवार व नागरिकांनी शोक व्यक्त केला आहे.

# शिक्षक कृतज्ञता सत्कार सोहळा संपन्न




वैजापूर, दि. ७ (प्रतिनिधी) – ५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५० वर्षांपूर्वी जे शिक्षक शिकविण्यासाठी होते त्यांचा सत्कार जिल्हा परिषद हायस्कूल वैजापूर मध्ये शिकत असलेल्या १९७५ ते १९८१ वर्षाच्या विद्यार्थी एस एस सी १९८१ च्या विद्यार्थ्यांनी केला हा शिक्षक कृतज्ञता सोहळा वनश्री हॅाटेल लासूर रोड येथील हॉलमध्ये झाला. याप्रसंगी सत्कार मूर्ती श्री आसर सर श्रीमती बसवेकर मॅडम श्रीमती राजापूरकर मॅडम श्रीमती पाटील मॅडम उपस्थित होत्या.

याप्रसंगी बोलताना श्री आसर सर म्हणाले की, माझ्या आयुष्यात मी अनेक कार्यक्रम पाहिले परंतु इतक्या तन्मयतेने आपण सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या सोबत असलेल्या सर्व शिक्षकांचा सन्मान सत्कार केला वास्तविक आम्ही काही इतके मोठे कार्य केले नाही आम्ह सर्व महेनत करणारे व हुशार विद्यार्थी होते आम्ही फक्त आपणास शिकवले मार्गदर्शन केले आज आपणा सर्वांचे हे वैभव पाहून आम्ही नक्कीच आनंदित आहोत असेच उत्तरोत्तर प्रगती होत राहो हीच ईश्वर चरणी प्रार्थना इतर्हा सत्कार मूर्तीनी मोलाचे मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॅा संतोष गंगवाल यांनी केले.

तसेच आभार प्रदर्शन काझी सर यांनी केले याप्रसंगी विजय वेद अॅड नामदेव पाटिल संजय अभंग राजू अहिरवाडकर पुतळे डॉ. संतोष तोष्णिवाल डॉ. रामैया संजय रामैय्या संतोष बोथरा हुसेन पठाण संजय खैरणार वासुदेव बानाईतकर व इतर सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्या वतीने आज सकाळी राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

मनपा मुख्यालय येथे मा.आयुक्त श्री.अमोल येडगे यांच्या हस्ते राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, कल्पिता पिंपळे, मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे, लेखाधिकारी संजय कोलते, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ उज्वला भामरे, डॉ.शिंदे, कार्यकारी अभियंता वाईकर, सांस्कृतिक अधिकारी सर्वे श नाट्रेकर, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, संजय सुरडकर, रविंद्र खरात, अतुल बनकर, संतोष कोठाळे, करण साळवे, इंझ माम उल हक, सुनीता जगताप आदींची उपस्थिती होती.

## व्यावसायिकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घ्यावीत - जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – महामार्गालगत अतिक्रमणे काढण्याच्या मोहिमेस जिल्ह्यात सुरुवात झाली असून सोलापूर धुळे तसेच छत्रपती संभाजीनगर पैठण या म र्गालगत अतिक्रमणे काढण्यात येत आहेत.




रस्ता सुरक्षा अभियानाचा भाग म्हणून महामार्गालगत असणारी व्यावसायिक अतिक्रम णे काढण्याच्या मोहिमेस जिल्ह्यात शनिवार (दि. ५)पासून सुरुवात झाली. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ धुळे सोलापूर तसेच राष्ट्रीय महामार्ग ७५२ छत्रपती संभाजीनगर ते पैठण लगत असणारी अतिक्रमणे काढण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण विभागामार्फत ही मोहीम राबविण्यात येत आहे. आतापर्यंत ४७० पक्की दुकाने व ढाबे, २५५ कच्ची शेड, टपरी तसेच व्यवसायिक बोर्ड इ. साहित्य, सामुग्री हटविण्यात आली.

ही मोहीम राबवितांना विहित प्रक्रिया राबविण्यात आली असून पोलीस बंदोबस्तात अतिक्रमणे हटविण्यात येत आहेत.

**सोमवारी सोलापूर धुळे महामार्गावर** – गांधेली, सातारा, कांचनवाडी, नक्षत्रवाडी इ. भागात मोहीम राबविली जाणार आहे.

मोहीम पुढील १५ दिवस कन्नड तसेच पैठण पर्यंत सुरू राहील, असे राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण विभागामार्फत सांगण्यात आले.

दरम्यान नागरिक, व्यावसायिकांनी आपली अतिक्रमणे स्वतःहुन काढून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे.

## जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता ९ वी व ११ वी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – जवाहर नवोदय विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२७–२८ साठी इयत्ता ९ वी व ११ वीच्या रिक्त जागांवरील प्रवेशासाठी 'लॅटरल एन्ट्री सिलेक्शन टेस्ट–२०२७' आयोजित करण्यात आली आहे. ही प्रवेश परीक्षा शनिवार, दि. १० एप्रिल २०२७ रोजी होणार असून पात्र विद्यार्थ्यांनी दि. ३० सप्टेंबर पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

**इयत्ता ९ वी प्रवेशासाठी पात्रता –** इयत्ता ९ वीच्या प्रवेशासाठी विद्यार्थी संबंधित जिल्ह्याचा मूळ रहिवासी असणे आवश्यक आहे. विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये मान्यताप्राप्त शाळेत इयत्ता ८ वीमध्ये शिकत असावा. विद्यार्थ्याचा रहिवासी जिल्हा आणि इयत्ता ८ वीचे अध्ययनाचे ठिकाण एकाच जिल्ह्यात असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्याची जन्म तारीख दि. १ मे २०१२ ते दि. ३१ जुलै २०१४ या कालावधीतील असावी. दोन्ही तारखांचा यामध्ये समावेश आहे. इयत्ता ९ वी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज व अधिक माहितीसाठी htts://cbseitms.nic.in/2026/nvsix_9या संकेतस्थळाचा वापर करता येईल.

**इयत्ता ११ वी प्रवेशासाठी पात्रता–** इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी विद्यार्थी संबंधित जिल्ह्याचा मूळ रहिवासी असावा. विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये मान्यताप्राप्त शाळेत इयत्ता १० वीमध्ये शिकत असणे आवश्यक आहे. इयत्ता १० वी यापूर्वीच उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेशासाठी पात्र राहणार नाहीत. विद्यार्थ्याचा रहिवासी जिल्हा आणि इयत्ता १० वीचे अध्ययनाचे ठिकाण एकाच जिल्ह्यात असावे. विद्यार्थ्याची जन्म तारीख दि. १ जून २०१० ते दि. ३१ जुलै २०१२ या कालावधीतील असावी. दोन्ही तारखांचा यामध्ये समावेश आहे. इयत्ता ११ वी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज व अधिक माहितीसाठी https://cbseitms.nic.in/2026/nvsxi_11 या संकेतस्थळाचा वापर करता येईल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी या प्रवेश परीक्षेची संधी घेऊन विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावे, असे आवाहन जवाहर नवोदय विद्यालय प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# जलजीवन मिशनच्या अपूर्ण कामांची चौकशी करा- खा. संदिपान भुमरे





छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – प्रत्येक घरी पाणीपुरवठा करणाऱ्या 'जलजीवन मिशन' या योजनेअंतर्गत अनेक गावांमध्ये नळाद्वारे पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. अशा अपूर्ण कामांची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करा,असे निर्देश खा. संदिपान भुमरे यांनी आज येथे दिले.

जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण (दिशा) समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली. केंद्र शासनाच्या विविध योजनांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी खा. संदिपान भुमरे हे होते. तर सह अध्यक्ष खा. डॉ. कल्याण काळे, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, विधान परिषद सदस्य सुहास शिरसाट, विधान सभा सदस्य आ.अब्दुल सत्तार, आ. रमेश बोरनारे, आ. प्रशांत बंब, आ. संजना जाधव, आ. विलास भुमरे तसेच जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके तसेच सर्व लोक प्रतिनिधी सदस्य, विभागप्रमुख अधिकारी आदी उपस्थित होते. बैठकीत प्रारंभी मागील बैठकीच्या अनुपालन अहवालावर चर्चा झाली. त्यात प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्गाच्या काम ंबाबत चर्चा झाली. त्यावेळी महामार्ग या विषयावरील चर्चेसाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल,असे खा. भुमरे यांनी जाहीर केले. प्रधानमंत्री पीक विमा योजनेचीही जिल्ह्यात योग्य पद्धतीने अंमलबजावणी व्हावी. त्यासाठी निकषांमध्ये व भरपाई देण्यासंदर्भात नियमांमध्ये बदल होणे अपेक्षित आहे. याबाबत केंद्रीय कृषी मंत्र्यांकडे बैठक घेण्यात येईल,असेही खा. भुमरे यांनी सांगितले.त्यानंतर प्रधानमंत्री आवाज योजना शहरी, बायो मायनिंग, बायो मेडीकल वेस्ट, जलजीवन मिशन इ. विषयांवर चर्चा झाली. जलजीवन मिशन योजनेद्वारे झालेल्या कामांबाबत तक्रारी असून गावांमध्ये नळाला पाणी येत नाही, अशा अपुर्ण कामांबाबत चौकशी करावी,असे निर्देश खा. भुमरे यांनी दिले. तसेच शेतकऱ्यांना शेतीला पाणी पुरवठा करता यावा यासाठी भारनियमन न करता वीज पुरवठा करावा,असेही निर्देश त्यांनी दिले. उर्वरीत विषयांवर शुक्रवार दि.१८ रोजी सकाळी ११ वा. बैठक घेण्यात येईल,असे खा. भुमरे यांनी जाहीर केले.

# शाळा परिसर तंबाखूमुक्त करा - जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - - जिल्ह्यात तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे, शाळा व शैक्षणिक संस्थांचा परिसर तंबाखूमुक्त करा.तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत व्यापक जनजागृती करा,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिल्या.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समन्वय व सनियंत्रण समितीची बैठक जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. बैठकीस अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पद्मजा सराफ, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी छाया आवरगावकर, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे आकाश तळवलकर, अन्न व औषध प्रशासनाचे डी. व्ही. पाटील, कामगार अधिकारी अक्षय ठोकळ यांच्यासह आरोग्य, शिक्षण, पोलीस व अन्य संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, शाळा व शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होणार नाही, याची काटेकोर दक्षता घ्यावी. शैक्षणिक संस्थांच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीस असलेल्या प्रतिबंधाची प्रभावी अंमलबजावणी करावी. प्रत्येक शाळेने तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्थेसाठी निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता करावी. यासाठी शिक्षण विभागासह संबंधित यंत्रणांनी नियमित कार्यवाही करावी.

सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने अधिनियम (COT>PA-2003) अंमलबजावणीसाठी पथके सक्रिय करून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमित कारवाई करावी. तंबाखूजन्य पदार्थांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जाहिराती तसेच प्रायोजकत्वासंदर्भातील उल्लंघनांवर नियम ानुसार कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

ग्रामपंचायती, शाळा-महाविद्यालये आणि विविध शासकीय विभागांच्या सहभागातून तंबाखूविरोधी जनजागृती अधिक व्यापक करावी. विशेषतः विद्यार्थी व युवकांना तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या आरोग्यविषयक दुष्परिणामांची माहिती देण्यासाठी प्रभावी उपक्रम राबवावेत, असेही जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी सांगितले.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत विविध विभागांना सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या आणि आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा यावेळी आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियमितपणे जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाकडे सादर करावा, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

## पैठण तालुक्यात शासकीय वाळू डेपोतील वाळूसाठ्याचा ई-लिलाव

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - पैठण तालुक्यातील मौजे ब्रम्हगाव (चतुर्थ फेरी) व मौजे हिरडपुरी (प्रथम फेरी) येथील शासकीय वाळू डेपोमधील शिल्लक वाळूसाठ्याची ई-निविदा व ई-ऑक्शन पद्धतीने लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, अशी माहिती तहसीलदार ज्योती पवार यांनी दिली आहे.

लिलावासाठी ऑनलाइन नोंदणी दि. ८ ते २२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत करता येईल. ऑनलाइन ई-अक्शन प्रक्रिया दि. २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत होणार आहे. लिलावाच्या सविस्तर अटी व शर्ती, हातची किंमत तसेच अन्य माहिती http://mahatenders.gov.in व https://chhatrapatisambhajinagar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच उपविभागीय अधिकारी पैठण-फुलंब्री व तहसील कार्यालय, पैठण येथे उपलब्ध आहे, असेही कळिवण्यात आले आहे.

(पान १ वरून)

## ५८ लाख कुणबी नोंदी....

काही लोक मराठा आरक्षणाला विरोध करण्यासाठी मुद्दाम आंदोलनाची भाषा करीत असतील तर ते चुकीचे असून, याद्वारे विनाकारण सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. सरकारने काहीही चुकीचे केलेले नाही व तशी भूमिकाही नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न कायदेशीर चौकटीत आणि सर्व समाजांच्या हिताचा विचार करून सोडविण्याची सरकारची भूमिका असून, पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत', असेही विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

## मराठा विद्यार्थ्यांना ओबीसीप्रमाणेच...

शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधांचा लाभ देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याचा थेट फायदा तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होऊ शकतो. शिक्षणाचा खर्च, विविध शैक्षणिक सवलती आणि उपलब्ध योजनांचा लाभ घेण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. विशेष म्हणजे, या निर्णयाची अंमलबजावणी संबंधित विभागीय कार्यालये आणि विद्यापीठांनी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे केवळ घोषणा न राहता प्रत्यक्ष लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर असणार आहे.

### कुणबी नोंदींची उपलब्धता जिल्ह्याच्या संकेतस्थळावर; मंडळस्तरावर शिबिरे आयोजीत करुनही देणार माहीती

# प्रत्येक ग्रामपंचायतीवर याद्या प्रदर्शित करा- डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

छत्रपती संभाजीनगर, दि.७ (प्रतिनिधी) - जिल्ह्यात आढळलेल्या मराठा कुणबी, कुणबी मराठा नोंदींची माहिती जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच मंडळस्तरावर शिबिरांचे आयोजन करुनही ही माहिती लोकांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिली आहे.

दरम्यान प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सुचना फलकावर त्या त्या गावातील याद्या प्रदर्शित कराव्या असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज दुरदृष्यप्रणालीद्वारे दिले आहेत.

मराठा, मराठा कुणबी, कुणबी मराठा अशा जात नोंदींची माहिती जुन्या दस्तऐवजांवरुन सापडल्या आहेत. त्यांची संख्या जिल्ह्यात ५११३ आहे. तालुकानिहा या नोंदी याप्रमाणे, सोयगाव ३१, पैठण-१८४, वैजापूर-६८७, सिल्लोड- ३५७, गंगापुर-७६१, खुलताबाद-३४१, फुलंब्री-२६१, छत्रपती संभाजीनगर-१०३९ व कन्नड-१४५२ इतक्या आहेत. या सर्व नोंदी व त्यांचे दस्तऐवज डिजीटल स्वरुपात जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. https://chhatrapatisambhajinagar.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर या नोंदी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. संकेतस्थळावर मराठा कुणबी दस्त नोंदी असा स्वतंत्र टॅग उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यावर जाऊन प्रत्येक तालुकानिहा नोंदी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यावर क्लिक करुन नोंदींची यादी, नाव व दस्ताचा प्रकार पाहता येतो. दस्त यावर क्लिक केल्यास प्रत्यक्ष दस्तही डिजीटल स्वरुपात प्रमाणित केलेली प्रत पाहता येते.

दरम्यान या संदर्भात आज राज्याचे जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दुरदृष्यप्रणालीद्वारे आढावा घेतला. त्यात त्यांनी निर्देश दिले की, प्रत्येक जिल्ह्यात मंडळिनहाय शिबिरे आयोजीत करुन लोकांना ह्या याद्या पहावयास उपलब्ध करुन द्याव्या. मराठवाड्यात येत्या दि.१७ रोजी विशेष ग्रामसभा घेऊनही माहिती देण्याचे नियोजन करता येईल,असे श्री. विखे पाटील यांनी सांगितले. तसेच संकेतस्थळावर नोंदी उपलब्ध करुन देण्याच्या पुढाकाराच्या प्रयत्नाची श्री. विखे पाटील यांनी वाखाणणी केली. तसेच या नोंदींपैकी मोडी लिपी, ऊर्दू नोंदींच्या भाषांतर, लिप्यांतराचीही सोय उपलब्ध करुन द्यावी,असे त्यांनी सांगितले.

**जिल्ह्यात मंडळनिहाय शिबिरे**

जिल्ह्यात दि.१० ते १७ दरम्यान सर्व तालुक्यात मंडळिनहाय कुणबी मराठा जात प्रमाणपत्र वितरण, तसेच याद्या पाहण्यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ते याप्रमाणे-

- अपर तहसिल छत्रपती संभाजीनगर- (एकूण मंडळ-५) दि.१० भावसिंगपुरा, दि.११- पंढरपूर, दि.१२ कांचनवाडी, दि.१५ उस्मानपुरा, दि.१७ - छत्रपती संभाजीनगर.
- छत्रपती संभाजीनगर (एकूण मंडळ-९)- दि.१०- चौका, दि.११ वरुड काझी, पिसादेवी, दि.१२- शेकटा, लाडसावंगी, दि.१५- चिकलठाणा, करम ाड, दि.१६-कचनेर, चित्तेपिंपळगाव.
- पैठण (एकूण मंडळ-१२)- दि.१०-पाचोड, आडूळ, दि.११-आपेगाव, विहामांडवा, दि.१२- पैठण, पिंपळवाडी, दि.१५-बालानगर, नादर, दि.१६-ढोरकीन, निलजगाव, दि.१७-बिडकीन, लोहगाव.
- फुलंब्री (एकूण मंडळ-५)- दि.१०-आळंद, दि.११-बाबरा, दि.१५-पिरबावडा, दि.१६-वडोद बाजार.
- खुलताबाद(एकूण मंडळ-४)- दि.१०- खुलताबाद, दि.११- वेरुळ, दि.१२- सुलतानपूर, दि.१३- बाजारसावंगी.
- कन्नड (एकूण मंडळ-१०)- दि.१०-नाचनवेल, चिंचोली, लिंबाजी, दि.११- देवगाव रंगारी, चापानेर, दि.१२-हतनूर, चिकलठाण, दि.१३- कन्नड- नागद, दि.१५- करंजखेडा.
- सिल्लोड (एकूण मंडळ-११)- दि.१०-भराडी, बोरगाव बाजार, आमठाणा, दि.११- सिल्लोड, पालोद, निल्लोड, दि.१५- अंभई, दि.१६-अजिंठा, शिवना, दि.१७-गोळेगाव बु., उंडणगाव.
- सोयगाव (एकूण मंडळ-४)- दि.११- सोयगाव, सावळदबारा, दि.१५-जरंडी, दि.१६- बनोटी.
- गंगापूर(एकूण मंडळ-१२)- दि.१०-वाळूज, तुर्काबाद, दि.११-आसेगाव, गाजगाव, दि.१२- हर्सूल, डोणगाव, दि.१५-सिद्धनाथ वडगाव, गंगापूर, दि.१६- मांजरी, जामगाव, दि.१७- भेंडाळा, शेदूरवादा.
- वैजापूर(एकूण मंडळ-१२)- दि.१२- गारज, शिऊर, दि.११- लोणी खु., जानेफळ, दि.१२- खंडाळा, बोरसर, दि.१५-लासूरगाव, महालगाव, दि.१६- बाबतरा, नागमठाण, दि.१७-वैजापूर, घायगाव.

# गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करा - पालकमंत्री



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - सार्वजनिक गणेशोत्सव हा शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. यंदाचा गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा व्हावा. उत्सवाच्या आनंदाला कोणत्याही प्रकारे गालबोट लागू नये, यासाठी पोलीस प्रशासनासह म हानगरपालिका, महावितरण व अन्य संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयातून काटेकोर नियोजन करावे. गणेश मंडळांना आवश्यक परवानग्या व नागरी सुविधांसंदर्भात अडचणी येणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असे निर्दे श पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी आज दिले.

सार्वजनिक गणेशोत्सव-२०२६ च्या पूर्वतयारीसंदर्भात पालकमंत्री संजय सिरसाठ यांच्या अध्यक्षतेखाली एमआयटी युनिव्हर्सिटी कॅम्पस, बीड बायपास रोड येथील मंथन हॉलमध्ये आज समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस म ाजी खासदार चंद्रकांत खैरे, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त कल्पना पिंपळे, पोलीस उपायुक्त शशिकांत सातव, महावितरणचे अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. शिरसाठ म्हणाले की, गणेशोत्सवाच्या काळात शहरातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी विशेष नियोजन करावे. मुंबई येथे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर गर्दीचे व्यवस्थापन, मिरवणूक मार्ग आणि विसर्जनस्थळी सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घ्यावी. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसाम ान्य नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. म हानगरपालिका व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी गणेश मंडळे आणि नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात. गणेश मंडळांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि विधायक उपक्रमांवर भर द्यावा. उत्सवाच्या शेवटच्या पाच दिवसांत नियमानुसार रात्री १२ वाजेपर्यंत ढोल पथके व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येतील. मात्र, उत्सवाच्या आनंदाला गालबोट लागणार नाही आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील, याकडे पोलीस प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे. ध्वनिप्रदूषणासंदर्भातील नियमांचेही काटेकोर पालन करण्यात यावे, असे निर्देश पालकमंत्री श्री. शिरसाठ यांनी दिले. पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी गणेशोत्सवासाठी पोलीस विभागाने केलेल्या तयारीची माहिती दिली. शहरातील बंदोबस्त, वाहतूक व्यवस्था, मिरवणूक व विसर्जन मार्ग, गर्दीचे व्यवस्थापन यांचे नियोजन करण्यात येत आहे. पोलीस उपायुक्त व सहायक पोलीस आयुक्त स्तरावर गणेश मंडळांच्या बैठका घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या जात आहेत. वाळूज व पंढरपूर परिसरासाठीही विशेष नियोजन करण्यात आले आहे. गणेश मंडळांना परवानगी प्रक्रियेत अनावश्यक अडचणी येणार नाहीत, याची दक्षता घेतली जाईल. गतवर्षीप्रमाणे यंदाही डीजेच्या वापराबाबत प्रभावी कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

शहरात अंमली पदार्थांविरोधात गेल्या दोन वर्षांत मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली आहे. गणेशोत्सव काळातही अवैध व समाजविघातक कृत्यांवर पोलिसांचे बारकाईने लक्ष राहील. नागरिकांनी गणेशोत्सव उत्साहात साजरा करताना पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त श्री. पवार यांनी केले. उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांनी गणेशोत्सवाची परंपरा आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. सार्वजनिक गणेश मंडळांना त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे प्रात्यक्षिक आणि सादरीकरण करण्याची संधी मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच गणेशोत्सवाच्या दोन दिवस आधीपासून 'ड्राय डे' ठेवण्याची मागणी त्यांनी केली. महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त कल्पना पिंपळे यांनी स्वच्छता, रस्ते, विसर्जनस्थळे तसेच अन्य नागरी सुविधांबाबत महानगरपालिकेने केलेल्या तयारीची माहिती दिली.

# भरती परीक्षा सुधारणांसाठी उच्चस्तरीय टास्क फोर्सचा राज्यव्यापी संवाद

- सहा विभागांना याच महिन्यात भेटी
- विद्यार्थी, उमेदवार व संबंधित घटकांशी साधणार थेट संवाद

मुंबई, दि. ७ : राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चस्तरीय टास्क फोर्स गठीत केला आहे. राज्यातील भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी टास्क फोर्स राज्यातील सर्व सहा विभागांना प्रत्यक्ष भेट देणार आहे.

या भेटीदरम्यान विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था तसेच अन्य संबंधित हितधारकांशी थेट संवाद साधून त्यांच्या सूचना, अडचणी व अभिप्राय जाणून घेतले जाणार आहेत.

**टास्क फोर्सच्या विभागनिहाय भेटींचे वेळापत्रक**

- पुणे विभाग - १२ सप्टेंबर २०२६,स्थळ : सावित्रीबाई फ ुले पुणे विद्यापीठ, पुणे, ई-मेल : pune-examreformstaskforce@maharashtra.gov.in
- नागपूर विभाग - १६ सप्टेंबर २०२६, स्थळ : डीपीडीसी हॉल, नियोजन भवन, सदर पोलीस स्टेशनच्या मागे, सिव्हिल लाइन्स, नागपूर, ई-मेल : nagpur-examreformstaskforce@maharashtra.gov.in
- अमरावती विभाग - १७ सप्टेंबर २०२६, स्थळ : अमरावती, ई-मेल : amravati-examreformstaskforce@maharashtra.gov.in
- छत्रपती संभाजीनगर विभाग - २१ सप्टेंबर २०२६ स्थळ : स्मार्ट सिटी कार्यालय, आमखास मैदानाजवळ, छत्रपती संभाजीनगर, ई-मेल : csn-examreformstaskforce@maharashtra.gov.in
- कोकण विभाग - २९ सप्टेंबर २०२६, स्थळ : चेतना महाविद्यालय व मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई, ई-मेल : konkan-examreformstaskforce@maharashtra.gov.in
- नाशिक विभाग - ३० सप्टेंबर २०२६, स्थळ : जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, ई-मेल : nashik-examreformstaskforce@maharashtra.gov.in

नागरिक व संबंधित हितधारक आपल्या सूचना व अभिप्राय संबंधित विभागाच्या वरील ई-मेल पत्त्यावर पाठवू शकतात. या विभागनिहाय संवादातून प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा टास्क फोर्सकडून अभ्यास करण्यात येणार आहे. त्याआधारे भरती परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध, परीक्षा सुरक्षेचे बळकटीकरण, प्रक्रियेतील पारदर्शकता व विश्वासार्हता वाढविणे तसेच परीक्षा व्यवस्था अधिक उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक सुधारणांबाबत शासनास शिफारशी सादर करण्यात येतील. भेटीची वेळ, सहभागाची प्रक्रिया तसेच इतर सविस्तर माहिती संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाकडून स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

## सदस्यत्व अपात्रतेबाबत ९ नगरसेवक, नगरसेविकांची सुनावणी संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सदस्य विरोधात दोन पेक्षा अधिक अपत्य, अतिक्रमण, अनाधिकृत बांधकाम तसेच शहागंज येथील अतिक्रम णाला प्रोत्साहन देण्यासंदर्भात दाखल झालेले गुन्हे या बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (१), १० (१-ऊ) नुसार सदस्यत्व अपात्रते बाबत टप्पेनिहाय सुनावण्या घेण्यात येत आहे.

यानिमित्त आज एकूण नऊ सदस्यांची सुनावणी आयुक्त अमोल येडगे यांनी घेतली. आज स. सदस्या श्रीमती फरजाना गुलाम रसूल (अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम), श्री मुंशी भिकन शेख (अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम), श्री पठाण मझर (अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम), श्री स्वामी विश्वनाथ गुरुलिंग (अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम), श्री. अली मीर वाजेद (अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम), श्री. अशोक हिवराळे (अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम) श्री अब्दुल समीर (दोन पेक्षा अधिक आपत्य) श्री. मुंशी भिकन शेख (दोन पेक्षा अधिक आपत्य), श्री पठाण मझर (दोन पेक्षा अधिक आपत्य) यांची सुनावणी घेण्यात आली.

तसेच १५ सप्टेंबर २०२६ रोजी एकूण ११ सदस्यांची सुनावणी घेण्यात येणार आहे. सुनवणी झालेल्या सदस्यांनी मागणी केल्यानुसार त्यांना म्हणणे मांडण्यासाठी वेळ वाढवून मिळावी अशी मागणी होती त्यानुसार त्यांना पुढील तारीख लेखी कळिवण्यात येईल, अशी माहिती महानगरपालिका निवडणूक विभागातर्फे देण्यात आली आहे.

## सुधारित बीजभांडवल,जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना; दि.३० पर्यंत अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सुधारित बीजभांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी अर्जांचे वाटप करण्यात आले आहे. परिपूर्ण भरलेले अर्ज दि. ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अर्ज सादर करण्यासाठी ही अखेरची मुदतवाढ देण्यात आली असून, त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही,असे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी कळिवले आहे.

## राजे उमाजी नाईक जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



छत्रपती संभाजीनगर – राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांचे प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी विजय राऊत यांच्या हस्ते राजे उमाजी नाईक यांचे प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.